Est. Sept 1994 2(f) & 12 (B): March 2006

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

**Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth. Dist. Parbhani 431516.**

**NAAC Accredited with Grade- B**

(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000

Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsonpeth@gmail.com

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

## EXTENSION ACTIVITY

### Writing in News Papers by Faculty

Our Faculties Believe that they have Social Responsibility and therefore they always involve in the activities in interest of the Society. Some faculties write Articles in Newspapers on Values, Current Issues, Ethics, Contribution of national Heroes, social reformers, political, religious, social reformers, literary criticism etc.

One of our faculty members **Dr. Vitthal Jaybhaye** writing articles in various daily Marathi News Papers from Maharashtra such as Loksatta, Sakal, Punyanagari, Deshonnati, Adhunik Kesari, Godateer Samachar, Marathwada Sathi, Samrat, Someshwar Sathi, Prajapatra etc. From last two years, his weekly Tukaram Niti regarding the practical application of the Abhangas of Sant Tukarama is noteworthy and appreciated throughout the Varkari sphere of Maharashtra.



आधुनिक केसरी

23 Apr 2023

https://www.adhunikkesari.com/epaper/news/26320/6443e867d99cd

तुकारामनीती
भाग -50

# पाईकपणें जोतिला सिद्धांत । सूर धरी मात वचन चित्तीं ॥

प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

अतुल्य महाराष्ट्र

# गुरु हा धैर्याचा डोंगरु | कदाकाळी डळमळेना||







केसरी




# शिवजन्मोत्सव: अखंड प्रेरणादायी सोहळा!



दैनिक प्रभावती नगरी
www.prabhawatinagari.com

दैनिक प्रभावती नगरी
• गुरुवार दि.११ जानेवारी २०२४ • पान २

### माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर येथे रक्तदान शिबिर

जिंतूर–माँ साहेब जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगरातील लक्ष्मी मंगल सेवा केंद्र,१४ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी तीन या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे परिणामी रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होत नसल्यामुळे रुग्णाला आपला जिव गमावण्याची वेळ येते त्यामुळे सामाजिक दृष्टिकोन ठेऊन सकल मराठा समाज व छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे या शिबिर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या जिंतूर तालुकाध्यक्षा रेखाताई भोंबे या राहणार आहेत. तर या शिबिराचे उद्घाटन,वैद्यकीय अध्यक्ष डॉ. रवींद्र चांडगे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सविता बायस्कर डॉ. गीतांजली कान्हडकर, डॉ. शीतल चिटे, डॉ. दीपा पाठक, शालिनीताई देशमुख, शालिनीताई खिल्लारे आदींची उपस्थिती राहणार आहेत म्हणून सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी ज्यास्तीत ज्यास्त रक्तदात्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# युगनिर्मात्या आईसाहेब आणि प्रज्ञावंत सुपुत्र


एका महान मातेची आणि एका देदीप्यमान सुपुत्राची आज जयंती! युगनिर्मात्या आईसाहेब जिजाऊ आणि प्रज्ञावंत सुपुत्र स्वामी विवेकानंद या दोन्ही महान विभूतींचा जयंती निमित्त शत शत नमन! हा अतिशय आनंददायी योग आज जुळून येतांना संपूर्ण भारतासाठी निश्चितच हा गौरवपूर्ण दिवस! सतराव्या शतकात जन्मलेल्या जिजाऊ आईसाहेब ह्या इतिहासातील सुवर्णपान आहेत तर त्यांच्या नंतर एकोणिसाव्या शतकात जन्मलेले स्वामी विवेकानंद हे तर्कशास्त्र-तत्त्वज्ञान यांचे आवडते अधिष्ठान आहेत. एका मातेने आपल्या सुपुत्र शिवबांची रयतेचे राज्य स्थापन करतांना छत्रपती शिवाजी महाराजांसारखे नरत्न घडवले तर स्वामीजींनी जगभर फिरून भारतीय मुलभूत तत्त्वज्ञानाची ओळख संपूर्ण जगाला करून दिली. आज एकाच दिवशी एका महान माता–सुपुत्रांचा गौरव ही आम्हा भारतीयांसाठी मोठी अभिमानाची गोष्ट त्यांच्या देदीप्यमान कर्तृत्वाने आणि सुसंस्कारित पालन पोषणाच्या बळावर अनेकविध सुपुत्रांनी आकाशाला गवसणी घालण्याचे भव्य–दिव्य कार्य केल्याचा इतिहास सर्वसाक्षी आहे!


छत्रपती शिवबांसारखे पुत्ररत्न घडवून आपल्या सर्वोत्तम संस्काराने ज्या मातेने स्वराज्याचा रयतेचे साम्राज्य उभे केले अशा राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांचा इतिहास सुद्धा तेवढाच भव्य–दिव्य आहे! बालपणात सिंदखेडच्या भोसले घराण्यातील शहाजीराजे भोसले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संपूर्ण जिजाऊंच्या पाठबळीतच पुढचा होता. जाधव–भोसले यांच्यात वैमनस्य झाला. दुर्दैवाने दोन्ही घरात प्रचंड विद्रुप आले, परिणामी जिजाऊंचे माहेर कायमचे तुटले, परंतु न डगमगता त्यांनी शहाजीराजे भोसले यांचा संसार उजळवून टाकला. जिजाऊंसमोर अनेक अडचणींचे पहाड उभे होते. त्यातच शहाजी राजांना पुणे परगणा सोडून बंगळुरूला जावे लागले. जेष्ठ पुत्र संभाजींनी आपल्या वडिलांना भक्कम साथ दिली तर इकडे जिजाऊंनी शिवबांना मजबूत–तडफ बनवले. मुघलशाही–कुतुबशाही–आदिलशाही–निजामशाही या बलाढ्य शाह्यांशी चार हात करण्याचे शारीरिक–मानसिक सामर्थ्य शिवबामध्ये निर्माण केले.

काळ मोठा खडतर होता. गाढवांचा नांगर फिरलेल्या पुण्याच्या भूमीत अठरापगड जातीतील मावळ्यांच्या साथीने सोन्याचा नांगर फिरविण्याचे महत्कार्य आईसाहेबांनी केले! शूर–धाडसी–पराक्रमी मातेने बाळकडू लाभलेल्या शिवबांनी वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला काबीज करून स्वराज्याचे तोरण बांधले आणि नंतर मागे वळून पहिलेच नाही!

एकामागून एक आक्रमणे, सह–काटशहांनी जीवन व्यस्त–त्रस्त होत असतांना शिवबांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभे राहिल्या! युद्ध आणि व्यवहारकुशलतेने सूक्ष्म निरीक्षण–परीक्षण–मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मांसाहेबांनी केले. विजापूर–मुघलसत्ताच्याशी संघर्ष, अफजलखान प्रकरण, पन्हाळगडचा वेढा, पावनखिंड लढाई, शाहिस्तेखान प्रकरण, सुरतेची लूट, पुरंदरचा तह, आग्रा प्रकरण, मुघलांसोबत तह, उमराणी–नेसरीची लढाई आणि छत्रपती शिवबांचा राज्याभिषेक या सर्वच घटना सर्वसामान्यांचे डोळे दिपवून टाकणाऱ्या आहेत आणि या पाठीमागे खंबीर मार्गदर्शन कुणाचे असेल? तर ते मातोश्री जिजाऊंचे! जिजाऊंनी केवळ स्वराज्यच उभे केले नाही तर आपल्या मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची जिद्द निर्माण केली! छत्रपती शिवबांनी केलेले कार्य हे केवळ शक्तीचे कार्य नसून त्यामागे प्रचंड बुद्धिचातुर्य होते हे लक्षात घ्यावे लागेल. जात–धर्म–पंथ यांचा संकुचित विचार कधी कुणाला शिवला नाही. सामान्यातील सामान्य आणि स्त्रिया समान मानून स्वराज्याची बांधणी माता जिजाऊंनी मोठ्या धीरोदत्तपणे केली आणि घराघरांत स्वातंत्र्य आत्मविश्वास पेरण्याचे महत्कार्य केले! याचाच परिणाम म्हणजे लोक स्वराज्यासाठी स्वतःचा जीव द्यायला तयार झाले! जीवा महाला, शिवा काशिदांसारख्या अनेकांनी हसत बलिदान दिले आणि त्यावर 'बहुजन हिताय' शिवबांनी आपल्या राजमुद्रेसह रयतेचे मराठी स्वराज्य संस्थापित केले!

त्याच आज एक देदीप्यमान व्यक्तिमत्त्व, तेजोमय ब्रह्मचर्य, अमोघ वाणी आणि ज्ञान–ध्यान–साधनेने ओतप्रोत लेखणीच्या सामर्थ्याने जगाला आपली ओळख निर्माण करणारे मेंदू नाव दत्त म्हणजेच स्वामी





विवेकानंद जयंती म्हणजेच राष्ट्रीय युवक दिन! त्यांनी शिकागो जागतिक धर्मपरिषदेत बंधू–भगिनींनो शब्दांनी संपूर्ण जगाला भारताच्या वसुधैव कुटुंबकम तत्वाची ओळख करून दिली. जेमतेम ३९ वर्षे आयुष्य लाभलेले स्वामीजी म्हणजे ते चालते ज्ञानाचे विद्यापीठाचे अवयव ते सुखाचे कोश! रामकृष्ण परमहंस यांच्या गुरुतत्व स्पर्शाने स्वामीजी आध्यात्मिक–वेदांत दर्शनाने ओतप्रोत व्यक्तिमत्त्व बनले! नैतिक ब्रह्मचर्य, चरित्रसाधना, ज्ञानसाधना, ध्यान धारणा, आत्मसन्मान, आत्मभान, आत्मविश्वास या सद्गुणांच्या बळावर मनुष्य आकाशाला गवसणी घालू शकतो हे सिद्ध केले. धार्मिक अवडंबर, ब्राह्मण्यवाद, पुरोहितवाद, धर्माचे बोभाटा प्रदर्शन यांना पायबंद विरोध करतांना ईश्वर मंदिरात नसून तो माणसामाणसात आहे ही नवी म्हणजेच खरा हिंदू धर्म होय! असे स्वामीजी प्रतिपादन करत. स्वामीजींनी अजीवन युवकांना प्रेरित केले! उठा, जागे व्हा. स्वतः उठा आणि इतरांना उठवा.

मनुष्यजन्म सुफळ करा आणि आपले ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका! हे स्वामीजींचे शब्द म्हणजे तरुणांपासून ते शंभर वर्षांच्या माणसाने जीवनात अंगिकारण्यासारखे आहेत! युवकांमध्ये नित्य स्फूर्ती चेतविण्याचे महत्कार्य स्वामीजींनी केले. बलदंड देहयष्टी, देदीप्यमान–विद्वत्तापूर्ण व्यक्तिमत्त्व, अंगावर भगवे वस्त्र, फेटा परिधान केलेले स्वामीजी म्हणजे दिव्यत्वाची प्रतीती! अस्खलितपणे अनेक व्याख्याने, प्रचंड लेखन यातून अध्यात्म–विद्या और भारतीय दर्शन के बिना विश्व अनाथ हो जायेगा असे प्रतिपादन करून स्वामीजींनी भारताच्या ज्ञान समृद्धीला झळाळी दिली. स्वामी विवेकानंद केवळ संत नव्हते तर ते एक महान देशभक्त, विचारवंत, वक्ता, लेखक आणि मानवप्रेमी व्यक्तिमत्त्व होते! शिक्षण म्हणजे त्यातून विद्यार्थी शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकसित झाला पाहिजे. शिक्षणातून चारित्र्य–चारित्र्य घडले पाहिजे. मन–बुद्धी विकसित होऊन विद्यार्थी आत्मनिर्भर बनला पाहिजे. आचरण–संस्कारसंपन्न

शिक्षण गरजेचे आहे. शिक्षक–विद्यार्थी संबंध दृढ असावे. शिक्षक अत्यंत महत्त्वपूर्ण घटक असून तो आनंदी–सहिष्णू–प्रज्ञावंत–निर्व्यसनी असावा, त्याचा चुंबकीय प्रभाव आपल्या विद्यार्थ्यांवर नित्य राहील. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तंत्रशिक्षण आवश्यक आहे. शिक्षणातून जीवनात संघर्ष करण्याची वृत्ती जोपासली जावी. असे मौलिक विचार स्वामीजींनी प्रतिपादन केले. संपूर्ण जीवन केवळ आणि केवळ देशोत्थानासाठी अर्पण केले. स्वामीजींचे जीवन सर्वांसाठी आदर्श, नित्य मार्गदर्शक आहे! आज एका मातेची आणि सुपुत्राची जयंती साजरी करतांना केवळ पुष्पहार घालून, वंदन करून चालणार नाही. आजही काळ तेवढाच खडतर आहे! नवनवी आव्हाने आपल्यासमोर आ वासून उभी आहेत. पैशाची माणूस आपले सर्वस्व हरवून बसला आहे. आज शांत झोप लागत नाही! मोबाईल नावाच्या राक्षसाने घराघर गिळंकृत केलेय! गल्लीत सुद्धा माणूस वेडपटासारखा त्या डब्बड्यासोबत खेळतोय! एकटाच हसतोय! रात्रीकडे वेडेच वेडे! हे चित्र महाभयंकर आहे! तेव्हा आपल्या आदर्शांच्या जयंतीदिनी आपल्याला काहीतरी संकल्प करावे लागतील. मोबाईलपासून दूर राहून घराघरांत ग्रंथ वाचन करावे लागेल. सकाळ–सायंकाळ मोबाईल बंद ठेवून विश्वशांतीसाठी प्रार्थना म्हणावी लागेल! निरोगी–आनंदी जीवनासाठी सर्वांनाच व्यायाम–योग–प्राणायाम–ध्यान करावेच लागेल! मोबाईल ऐवजी मैदानावर खेळ खेळावे लागतील. मूल्य शिक्षण घराघरांत रुजवावे लागेल. माणसामाणसात सुसंवाद वाढवावा लागेल. असे झाल्यास घराघरांत जिजाऊ आणि त्यानंतर शिवराय आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखे सुपुत्र जन्माला येतील, अन्यथा आपली एक जयंतीचा इव्हेंट, बस्स!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९९६०८०६४०६८



Dr. V. K. Jaybhaye Written 100s of Articles on Ther Social Reformers

आधुनिक केसरी
28 Jul 2024
https://www.adhunikkesari.com/epaper/news/50322/66a4fe9bd68e6

# पृथक मी सांगों किती। धर्म नीती सकळां॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068


आधुनिक केसरी

**सकाळपासून ते सायंकाळपर्यंत स्वतःचे जीवन वाचा. एक दिवस तरी स्वतःचे संपूर्ण अवलोकन करा. आज आपण धावतोय, पळतोय कुणासाठी? काही वेळ शांत, निवांत एकांतात बसा आणि स्वतःला काही महत्वाचे प्रश्न विचारा. आपण सगळे जण मिडीयावर, समाजात, आपल्या कार्यक्षेत्रात सतत कार्यमग्न असतो. निश्चितच ही आनंदाची, अभिमानाची बाब आहे. हे करत असतांना आपली दिनचर्या काय आहे? पहाटे जाग्ल्यापासून ते शेवटी सायंकाळी पाठ टेकेपर्यंत आपण काय काय केले? दिवसभर काय काय करत आहोत? याचा एकदिवस आढावा घ्या आणि काही महत्वाचे प्रश्न स्वतःला विचारा. यात मी माझ्यासाठी, मन-बुद्धी-शांती-निरोग-आनंदासाठी काय काय करतोय?**

दिवसभरात कितीवेळा मी आनंदी आहे? कितीवेळा चिडचिड करतोय? यातून मला आणि माझ्या भोवतालच्या गोष्टींना लाभ किती आणि हनी किती होते आहे? एकदिवस याची टक्केवारी काढाच. त्यात जर नको असलेल्या बाबींचे प्रमाण जास्त असेल तर स्वतःवर काम करा. स्वतःला वेळ द्यायला सुरुवात करा. तुमचे अनमोल शरीर आणि आरोग्य तुमच्या हातातून निसटते आहे हे लक्षात घ्या. आज आपण आपल्या दैनिक कामात अनेकवेळा त्या कामाचा परिणाम आपल्यावर करून घेतो, निश्चितच हे योग्य नाही. आपले काम वेगळे आणि ते काम बाजूला झाले की; आपले जीवन वेगळे. याचा ताळमेळ लावतांना आपल्याला जमले पाहिजे. हे करण्यासाठी आपले दैनिक काम करतांना सहज आणि प्रेमाने करून घ्यावे आणि करावे. याचे दोन्ही बाजूंनी दूरगामी आणि मूलगामी चांगले परिणाम जाणवू लागतील. प्रेमाने जग जिंकता येते, युद्धाने सर्व संपते! जीवनाचे वैश्विक सत्य समजून-उमजून घेतांना आपल्याला कार्य आणि जीवन याचा योग प्रमाणात कार्यकारणभाव जुळवता आला पाहिजे. यासाठी आठवड्यात आपण स्वतःला आपल्या नित्य कामाव्यतिरिक्त एकाद्यातरी वेगळ्या कार्याला जसे की जंगल किंवा शेतात मनसोक्त भटकंती करणे, कविता करणे, एखादा ग्रंथ वाचणे, एखादा विषय घेऊन त्यावर चिंतन लिहिणे, झाडे लावणे, फुले गोळा करणे, दूरच्या मित्र अथवा नातेवाईकांना भेटायला जाणे इत्यादी केले तर सोमवारी किंवा आपल्या साप्ताहिक सुट्टीच्या दुसऱ्यादिवशी मोठ्या जोमाने, उर्जेने आपण पुन्हा कामाला लागू. त्यातून आपले आरोग्य आणि आपले नैमित्तिक काम चांगले होईल. सुट्टी म्हणजे हे करणे होय! सुट्टी मस्त एन्जॉय करण्यासाठी, जीवनाचा मनसोक्त आनंद लुटण्यासाठीच असते! आजकाल माणसं सुट्टीचा अर्थ विसरत आहेत. त्याच्या जोडीला एखादा तत्वज्ञ चिंतनशील लेखक, कवी वाचला पाहिजे. सहज उपलब्ध जगद्गुरू तुकोबांचा गाथा आणि त्यातील

**पृथक मी सांगों किती। धर्म नीती सकळां ॥१॥**
**अवघियांचा एक ठाव। शुद्ध भाव विठ्ठलीं ॥ध्रु.॥**
**क्षराअक्षराचा भाग। करा लाग पंढरीये ॥२॥**
**तुका म्हणे आगमींचें। मथिलें साचें नवनीत ॥३॥ (१२९६)**

हे अनमोल अभंग आपल्याला नित्य जाग्यावर ठेवतात, योग्य दिशेने वाटचाल करण्यास प्रोत्साहित करतात. तुकोबा मोठे चमत्कारिक चिंतक होते. त्यांना त्यांचा भोवताल सतत अस्वस्थ करत होता. आपला संसार, आपली माणसं आणि त्याला जोडून आपली भक्ती आणि परमार्थ! या सर्वांना तुकोबांनी कधी वेगळं केलंच नाही. तासंतास, दिवसभर तर कधी पहाटेपासूनच डोंगरावर जाऊन भजन-चिंतन करणारे तुकोबाराय मोठे विस्मयकारी समाजसुधारक होते. त्यांना इथल्या माणसांचे हित ध्यानात आले होते. त्यांना धर्म बऱ्यापैकी कळला होता, त्यातल्या त्यात वारकरी धर्म तर एकदम सखोल कळला होता. त्यातुनच ते वरच्या अभंगांसारखे चिंतन सहज मांडत राहिले. तुकोबांना जग संसाराची चिंता होती. आपण भक्ती करत असतांना किवा एखादी कृती करत असतांना भक्तीच्या स्तरावर जाऊन त्याचा विचार केला पाहिजे. भक्ती म्हणजे तासंतास मंदिरात जाऊन बसने नोव्हे. मंदिर हा भाव सर्वत्र, भोवताल निर्माण करणे म्हणजे भक्ती! जिथे मांगल्य, दिव्यता आणि रम्यता आहे ती ती सर्वस्थळे उत्तम प्रार्थनास्थळे आहेत. डोंगर, जंगल, नदी, समुद्र, झाडे, बगीचे इत्यादी ठिकाणे मला सर्वश्रेष्ठ प्रार्थनास्थळे वाटतात. त्यामुळेच तुकोबाराय इथे प्रथक शब्द वापरतात. पृथक म्हणजे वेगवेगळे आणि दुसरा अर्थ म्हणजे कितीवेळा सांगू? माणसांनो, धर्म आणि नीती म्हणजे काय?





धर्म म्हणजे गुणधर्म. आपल्याला भूक लागते, आपल्याला तहान लागते, आपल्याला दुःख नको आहे इत्यादी बाबी म्हणजे धर्म. धर्म कळण्यासाठी कुठे जाण्याची गरज नाही. एकदा निवांत बसावे, डोळे बंद करून जरा आत मध्ये पहावे. बरंच काही लक्षात येईल. आपला आतला कोलाहल थांबला नाही आणि तिकडे आपण पुन्हा एखाद्या कोलाहल प्रार्थनास्थळी जातो? प्रार्थनास्थळी भांडणे, लोटालोटी, आरडाओरडा, गोंधळ! प्रार्थना स्थळे शांती, चिंतन, स्वशोध यासाठी गावाच्या बाहेर निवांत ठिकाणी उभी आहेत! माणसांनी तिथेही जाऊन दुसरा गाव निर्माण केला. गावात, माणसांच्या गर्दीत, गोंगाटात, गोंधळात ईश्वरास्तीत्व कसे, कुठे आणि केंव्हा सापडणार? माणसाने स्वतःला ओळखावे. आपल्यावरून पुढचा कसा असेल? हे जाणून घेतले पाहिजे. या गुणधर्माला नीतीची जोड दिली पाहिजे. नीती म्हणजे आपण जिथे जगतो, वागतो, खातो, पितो, अधिवास आहे ते ठिकाण. आपले घर, वावर, ऑफिस, येतांना जातांनाचे वाहन, स्थळ, तिथले लोक, त्यांचे वर्तन, त्यावेळचे चिंतन, गप्पा इत्यादी ठिकाणी किंवा वेळी आपण कसे वर्तन करतो? काय काय बोलतो? कुणाविषयी बोलतो? आपले विचार काय आहेत? याचा परिपाक म्हणजे नीती. या सर्वच बाबींचा खोलवर प्रभाव आणि परिणाम तुम्हाला सायंकाळी झोपतांना जाणवेल. हा सर्वकाळ तुम्ही शांत, संयम, प्रेम, जिव्हाळा, कृतज्ञता, आपुलकी, सौहार्द भावात व्यतीत केला असेल, तर सायंकाळ शांत-समाधानी-प्रसन्न असेल. याला दैनंदिन नीती म्हणता येईल. मी माझे नेमून दिलेले काम इमाने इतबारे करतांना माझ्या भोवतालच्या माणसांचा माझ्याकडून कसल्याहीप्रकारचा उपमर्द होणार नाही याची काळजी घेणे म्हणजे दैनिक नीती धर्म पालन. याला तुम्ही कोणतेही नाव द्या, तो व्यवहार सर्वच साच्यात फिट्ट बसतो की नाही ते पहा? तुकोबाराय दैवत श्री विठ्ठलाकडे प्रश्न-उत्तरे घेऊन जात. जातांना भोवताल मंदिरात, प्रार्थनास्थळी जाणारे माझ्यासारखेच आहेत या भावनेने ते मंदिरात जायचे. त्यांचा भाव शुद्ध आणि आपल्या भोवतीच्या लोकांचाही भाव शुद्धच आहे! अशी त्यांची पक्की धारणा असे, परिणामी सर्वत्र त्यांना पांडुरंगाचे दर्शन होई. देवळात समोर सायनासंगीत मूर्ती उभी असली तरी दिसत नाही, आजूबाजूला पाहतापाहता तिथला पुलिस बंधू-भगिनी अलगद गाभाऱ्याबाहेर ढकलून देते आणि मग आपल्याला जाग येते, तोपर्यंत लोक, " ओ मामा, चला की पुढं, काय पाहताय इकडं तिकडं!" झालं देवदर्शन? दिसला देव? मोठी मजेशीर बाब आहे. अलीकडे प्रार्थनास्थळी प्रचंड गर्दी आहे. भांडणे, गोंगाट आहे. मोठे कठीण चित्र आहे. त्यासाठी एकएक क्षण चिंतन केले पाहिजे. क्षराक्षर म्हणजे सूक्ष्म काल. तो आपण कसा घालवतो. सकारात्मक चिंतनात घालवतो की कशात? यावर पुढची इमारत उभी आहे. सर्वकाळ मनात मानवी जीवनाच्या सर्वांगीण कल्याणाची भावना आपल्या ह्रदयात असलीच पाहिजे. वारी, पंढरीला जातो आणि चोरी करतो. नजर चांगली नाही. व्यर्थ बडबड, आत्मप्रौढी, मिरवतो, चोरून रांगेला लागून दर्शन घेतो. असं कसं जमेल बरं? क्षरक्षर हे केवळ श्री विठ्ठल, पंढरी! रोम रोम आणि क्षणक्षण पंढरी. आषाढी वारीच्या दिवशी, "ऐका पंढरीचे महिमान, राउळ तितुके प्रमाण तेथील तृण आणि पाषाण ते ही देव जाणावे." ही आहे खरी पंढरी आणि वारी. त्यासाठी त्यादिवशी आपण पंढरीच्या वाळवंटात लाखो वारकऱ्यांचा मेळा पाहून वंदन करणे, मनातील सर्व किल्मिषे काढून टाकणे म्हणजे पंढरीची वारी! शेवटी तुकोबांनी आपल्या हातावर नवनीत ठेवले आहे. नवनीत म्हणजे लोणी. दुधाचे शेवटून दुसरे रूप, यानंतर तुपच! लोण्याचे तूप करणे हे सोप्पे आहे लोणी काढण्यापर्यंतच्या प्रक्रियेपेक्षा! दोहन, उष्णता, साय, विरजण, उनवणी-शिळवणी घुसळण आणि त्यानंतर आले तर लोणी! असा हा आगमी म्हणजे सर्वात शेवटी भेटणारा पंढरीचा श्री विठ्ठल जो आपल्या सर्वांच्यात आहे. नवनीतासारखा मंथून मंथून घ्यावा लागतो तो. एवढा सहजा सहजी मिळत नाही. तो आपल्यात विराजमान असतांना आपण त्याला बाहेर शोधत आहोत! माय-बाप वाचकहो, आपले नित्य नैमित्तिक कर्म करतांना तिथे कृतज्ञ भाव, शांती, प्रेम, जिव्हाळा, आपुलकीचे बीजारोपण करूयात. माणसामाणसात देवाचे अस्तित्व पाहूया. जे बोलायचे ते पाठीमागे न बोलता समोरासमोर बोलूया. बोलण्यातुन विष निर्माण होता कामा नये, एवढी काळजी घेतली की तुकोबांची सेवा पोहोचली असे समजतो. भेटत राहू. जय तुकोबाराय!

'TUKARAM NITI'- Dr. Jaybhaye is writing under this Head in Daily Adhunik Kesri Since Last two years

जनसामान्य माणसांचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
Powered by - epaper.lokneta.in

# गांधीजी-शास्त्रीजींच्या पश्चात आपण त्यांचे काय केले...?




लोकनेता न्युज नेटवर्क

आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचा संयुक्त दिवस! या दोन्हीं महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या महान कार्याला आणि स्मृतींना विनम्र अभिवादन! आज ज्या दोन महापुरुषांची जयंती सर्वत्र देश आणि राज्यभर संपन्न होत आहे, त्यांच्या पश्चात आपण त्यांच्या मूल्य-तत्त्व-कार्यप्रणालीचे काय केले? यावर कृतीशील चिंतन-मंथन होणे काळाची गरज आहे. अलीकडच्या काळात राजकारण मोठ्या झपाट्याने बदलले आहे. राजकारणातील सुचिता पार धुळीला मिळाली आहे. एक काळ होता जेंव्हा सामान्य माणूस राजकारणी व्यक्तीकडे मोठ्या सन्मानाने पहायचा! हा नेता माणूस नक्कीच आपल्या भागाचे, राज्याचे आणि देशाचे भले करील(!) असा आशावाद सामान्य माणसांच्या मनात असायचा. मात्र अलीकडच्या दोन दशकात सर्व काही बदलले आहे. वर्तमान राजकारणी लोकांनी तर पक्षनिष्ठा, विचार प्रणाली, तत्वे इत्यादी आदर्श बाबी केवळ पुस्तकात वाचायला शिल्लक ठेवल्या आहेत! जवळपास सर्वच राजकारणी लोकांवरचा सामान्य माणसाचा विश्वास उडाला आहे. कोण काय करतोय? कोण कुठे आहे? कोण किती खरं बोलतोय? कोण कुणाला उजागर-चोरून भेटतोय? याचा लेखाजोखा सामान्य माणसाजवळ आहे. परिणामी आज माणसे राजकारणी माणसांना केवळ समोरासमोर सन्मान देतात आणि बाजूला सरकले की; हा किती बदफैली, भ्रष्ट, व्यभिचारी, वाळू चोर, गिट्टी चोर, रस्ते चोर, संडास चोर, गोरगरिबांची शेती चोर, सरकारचाटॅक्सचोर, वीज चोर आहे याची मोठ्या चवीने चर्चा करतात. आज गांधीजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमेला पुष्पहार घालणारे हात कसे आहेत? हा सुद्धा विचार नक्की व्हायला हवा!हे युवकांनो, आपली विरासत म्हणजेच आपला देदीप्यमान इतिहास नीट समजून घ्या! तुमच्या हाती उद्याच्या उज्वल भविष्याची कमान आहे. तुम्हीच उद्याच्या भारताचे शिल्पकार आहात! आपण आपले ऐतिहासिक महापुरुष आणि त्यांचे कार्य व्यवस्थित समजून घेतले पाहिजे. कुणी मिडीयावर एखाद्या महापुरुषांविषयी चुकीची पोस्ट केली असेल तर आपण त्याच्या मुळाशी जाऊन, विवेक जागृत ठेवून ती पोस्ट प्रसारित करावी. त्यानंतर त्यावर आपली प्रतिक्रिया दिली पाहिजे अन्यथा तिला दुर्लक्षित करायला हवे. तुमच्या माझ्या हातात मिडिया नावाचा हा महासागर असून यातून आपण अगदी चातकासारखे सातत्याने ज्ञानामृताचे कण वेचले पाहिजे. असे झाल्यास कुणीही तुमच्या तारुण्य शक्तीचा गैरवापर करणार नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आणि एकूणच देशाच्या उभारणीत मोलाचे योगदान राहिले आहे. लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदि धुरिणांचे योगदानही दुर्लक्षून चालणार नाही, परंतु आज गांधी-शास्त्री यांची जयंती असल्यामुळे त्यांच्यावर कटाक्ष टाकणे अगत्याचे आहे. गांधीजींनी व्रतस्थ जीवन जगतांना उपोषण, असहकार, सत्य, अहिंसा इत्यादी आत्मिक बाबींचा इंग्रज सत्तेच्या विरोधात मोठ्या चतुराईने वापर केला. याचा परिणाम इंग्रजांना आपला भारत देश स्वतंत्र करावा याची जाण झाली. गांधीजींनी शिक्षण संदर्भात नयी तालीम हा अत्यंत मूलगामी, कृतीशील कार्यक्रम आखला आणि तो प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवला. यामध्ये शासनाने ७ ते १४ वर्षापर्यंत नि:शुल्क आणि अनिवार्य मुलभूत शिक्षण द्यावे. स्वावलंबी आणि मातृभाषेत शिक्षण द्यावे. पाचवी पर्यंत सर्वांना एकच शिक्षण द्यावे. बालकांना शेती, ग्रामीण उद्योग, हस्तकला व्यवसाय, संगीत, चित्रकला, सामाजिक अध्ययन, सामान्य विज्ञान आणि शारीरिक शिक्षण इत्यादी गोष्टी अनिवार्य करून शालेय काळात बनवलेल्या कलाकृतींना बाजारात विकून शाळेला उत्पन्न मिळवून द्यावे. राजर्षी शाहू महाराजांच्या राज्यांत लहान मुलांना शिक्षण मोफत दिले जात असे आणि जे पालक आपले लेकरू शाळेत पाठवणार नाहीत त्या कुटुंबाला १ रुपया दंड लावला जायी. गांधीजींनी सांगितलेली नयी तालीम आणि शाहू महाराजांचे आदर्श शिक्षण आपले राज्य सरकार अंगीकारते आहे का? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. या उलट आपल्या शासनाने वीस पेक्षा कमी पटाच्या सरकारी शाळा बंद करण्याचा घाट घातला असून बाकी जि.प.च्या शाळा कंत्राटदाराकडून चालवल्या जातील असा आदेश काढला आहे. शिक्षकाची भरती सुद्धा कंत्राटी पद्धतीने केली जाणार आहे. शिक्षणात ही एक प्रकारची वेठबिगारी येणार म्हणायचे का? निश्चितच हे अधोगतीचे आणि शिव-फुले-शाहू-गांधी-आंबेडकर यांच्या महाराष्ट्राला शोभणारे नाही. माणसाच्या सर्वांगीण विकासाची मुलभूत गोष्ट म्हणजे शिक्षण आणि तिच बाब जर कंत्राटी आणि महाग करून ठेवल्यास विकसित देशाचे स्वप्न कुणाच्या जीवावर पहायचे? आपण सत्तेत आहात म्हणजे इथली मूलगामी शिक्षण व्यवस्था धुळीस मिळवणार आहात का? इथला सामान्य, गाव-खेडे, तांडा-वस्ती, गोर-गरीब, ऊसतोड कामगारांच्या मुलांनी पिढ्यानपिढ्या कोयते घेऊन अजीवन ऊसतोड करत गुलामीच करायची का? शिकलेले लोक प्रश्न विचारतात म्हणून पुन्हा जनता अशिक्षितच ठेवायची आहे का?दुसरीकडे स्वतंत्र भारताच्या उभारणीत लाल बहादूर शास्त्री यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. शास्त्रीजी वयाच्या अकराव्या वर्षी महात्मा गांधीजींसोबत भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उतरले. चंपारण्य सत्याग्रह,रौलेट ॲक्ट,जालियानवालाहत्याकांड आदींचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर केंद्रात रेल्वे मंत्री, विदेश मंत्री आणि गृह मंत्री इत्यादी महत्वपूर्ण खाती सांभाळली. १९६४ साली नेहरूंचे निधन झाले आणि शास्त्रीजी भारताचे दुसरे पंतप्रधान झाले. ते सत्तेवर आल्याबरोबर पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले आणि त्यात भारताने विजय मिळवला. यावेळी शास्त्रीजींनी 'जय जवान, जय किसान' हा नारा देऊन श्वेत क्रांती आणि हरित क्रांती घडवून आणली. यातून शेतकरी स्वावलंबी करण्याचे प्रयत्न झाले. पंजाब, हरियाना आणि उत्तर प्रदेशात गव्हाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात आले. मरणोपरांत त्यांना भारतरत्न सन्मानाने गौरवान्वित करण्यात आले.आज हे दोन्ही महापुरुष जाऊन अनेक दशके लोटली आहेत. तरीही त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा ठसा समाजमनावर खोलवर रुजलेला आहे. विद्यमान राजकारणी लोकांनी या त्यागी लोकांचा आदर्श समोर ठेवून राज्य-देश पुढे न्यायला हवे. शिक्षणाचे कंत्राटीकरन हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय लोकांना अजिबात रुचला नाही. गांधीजींची आणि शास्त्रीजींची जयंती साजरी करतांना गांधीजी आणि शाहू महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन समोर ठेवावा लागेल. दुसरीकडे 'जय जवान' म्हणतांना सैनिक कंत्राटी पद्धतीने भरले जाऊ नयेत. 'जय किसान' म्हणतांना शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळालाच पाहिजे. संपत्ती नक्की कमवा परंतु एखाद्या व्यक्तीने किती संपती कमावली म्हणजे तो महान होईल? त्यासाठी प्रत्येक आमदार-खासदाराने आपापल्या मतदार संघातील छोट्या छोट्या शाळा दत्तक घेऊन आपली थोडीशी कमाई तिथे देऊन दातृत्व दाखवावे. आपल्या भागातील शेतकरी-कष्टकरी लोकांच्या समस्या जाणून त्याची सोडवणूक करावी. असे केल्यास जनमाणसात मलीन-भ्रष्ट झालेली प्रतिमा उजळून गोरगरीब जनतेचे आशीर्वाद मिळतील! निवडणुकीच्या वेळी दारू-मटन वाटण्याची दुर्दैवी वेळ येणार नाही! पहा जमतंय का? जय जवान! जय किसान! जय विज्ञान!



प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये
मो.९९५८०६४०६८

Writing on National Heroes



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्वप्ने कधी पूर्ण होणार?

संपूर्ण जगाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाणारे अद्वितीय नाव, महान क्रांतिकारक, प्रखर राष्ट्र भक्त, कृतिशील समाजसुधारक, प्रज्ञावंत, ज्ञानाचे प्रतिक (दि सिंबल ऑफ नॉलेज), आधुनिक भारताचे अध्वर्यू , भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, नित्य स्मरणीय, अर्थतज्ञ, भारतरत्न, बोधिसत्व डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दिन! त्यानिमित्ताने डॉ.बाबासाहेबांच्या लढाऊ स्मृतींना कोटी कोटी वंदन! जगात अनेक महान विभूती जन्मापासून ते त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपले आयुष्य केवळ पर-ोपकारासाठी झिजवतात. या महामानवांच्या देदीप्यमान रांगेत महाराष्ट्राचे भूमिपुत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर अग्रस्थानी आहेत. काही काही माणसांचे एक आयुष्य त्यांच्या कार्यासाठी अपुरे पडते असे त्या व्यक्तीला आणि त्यांच्या चाहत्यांनाही नेहमीच वाटत असते. ऐन उमेदीचा काळ, प्रगल्भता आणि आणखी लोकोपयोगी भरपूर कामे शिल्लक असतांना जीवन पटलावरून त्यांची झा-लेली एक्झिट ही सर्वांच्या काळजाला चटका लावून जाते! असे प्रचंड लोकप्रिय, लोकोद्धारक व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतात आणि अक्षरशः इथली लाखो हृदये क्षणभर थांबतात! भारतीयांचे आभाळ फाटले! आता काय करावे? आपले दु:ख कुणाला सांगावे? कुणी कुणाचे सांत्वन करावे? कुणी कुणाच्या गळ्यात पडून रडावे? लोक सैरभैर झाले होते! त्यादिवशी जगाच्या इतिहासात एखाद्या व्यक्तीच्या अंत्य दर्शनाला येण्याची सगळी रेकॉर्ड तुटली! इथल्या उपेक्षित, वंचितांचा आवाज त्यांच्याप-ासून कायमचा पारखा झाला! आमचा तारणहार, माय-बाप काळाने आमच्यापासून हिरावून नेला! युवक, स्त्रिया,अबाल वृद्ध जमेल तसे अंत्यदर्शनासाठी गेले! अनेक जण गाव-ातच रडत बसले, तर कित्येकांनी अन्न-पाणी सोडले! संपूर्ण देश शोकसागरात बुडाला असतांना जीवनाच्या अंतिम सत्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना गाठले होते!

शेवटपर्यंतचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवास मोठा खडतर होता. त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगावर एक एक ग्रंथ लिहिला जाईल एवढा मोठा संघर्ष आणि त्यातूनच त्यांच्याकडून विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य संपन्न झाले. आईंचे लवकर निधन झाले असले तरी सुभेदार रामजींनी आपल्या लेकरांना सन्मानाने जगण्याचे संस्कार केले. टापटीपपणा, अभ्यास, वाचन इत्यादी शिदोरी त्यांना बालवयातच लाभली. चिकित्सक युवक भिमराव मोठे चाणाक्ष आणि बुद्धिमान होते. याचा परिणाम म्हणजे ते शाळेत शिक्षकप्रिय विद्यार्थी बनले. गुरुजींनी विविध ग्रंथ देऊन त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण केली. एकानंतर एक यशाची शिखरे पादाक्रांत करत त्यांना परदेशी शिक्षणाची संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचे सोने केले. अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेऊन अर्थशास्त्र विषयात डॉक्टरेट करून ते डॉ.भिमराव आंबेडकर झाले. परदेशातून भारतात परतताच त्यांना जातीभेदाचे प्रचंड चटके सोसावे लागले. लहानपणी अजाण असलेले बाबासाहेब आता सुज्ञ झाले होते. सुरुवातीला बडोदा संस्थानात नौकरी करण्याचा प्रयत्न केला, परंतु स्पृश्यास्पृश्यतेच्या झळांनी ते तिथे नौकरी करू शकले नाही. काही काळ वकिली केल्यानंतर त्यांना गावकुसाबाहेरील माणसांच्या व्यथा-वेदना स्वस्थ बसू देत नव्हत्या. त्याचवेळी त्यांनी कुठेही नौकरी करायची नाही, केवळ समाजातील वंचित, उपेक्षित लोकांचा आवाज बनायचे ठरवले.



आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अखंड आयुष्यात स्वतंत्र भारताची मजबूत उभारणी करण्याच्या अनेक बाबी अधोरेखित केल्या. यामध्ये भारतीय राज्यघटना हे त्यांचे सर्वोच्च कार्य आहे. राज्यघटनेची बांधणी करतांना कश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतचा जाती, धर्म, पंथाचा भारत देश त्यांच्या समोर होता. इथला कोणताच माणूस कोणत्याही सोयी-सुविधांपासून उपेक्षित राहणार नाही याची तरतूद राज्यघटनेत करून भारताला एका अत्युच्च शिखरावर विराजमान केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर किती दूरदृष्टीचे होते? याचा प्रत्यय राज्यघटना वाचल्यावरच जाणवतो.

असे असले तरी डॉ.आंबेडकरांनी आजच्या विकसित भारताची काही मूलगामी स्वप्ने पहिली होती. एखादा महापुरुष किती दृष्टा होता हे त्याच्या ग्रंथातील विचारावरून प्रत्यय येतो. डॉ.आंबेडकरांनी विकसित राष्ट्राची स्वप्ने पहिली होती. यामध्ये इथला तरुण उच्च शिक्षित, विवेकी, शीलवंत, गुणवंत, प्रज्ञावंत, मनाने व शरीराने मजबूत झाला पाहिजे असे स्वप्न पहिले होते आणि त्यासाठीच शिका हा महामंत्र दिला होता. शिक्षणच माणसाला सर्वांगीण विकसित आणि मजबूत बनवते अशी संपूर्ण खात्री त्यांना होती. त्याशिवाय मी, संपूर्ण भारत बौद्धमय करीन! ही एक महत्वपूर्ण प्रतिज्ञा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. दुर्दैवाने धर्मांतर केल्या नंतर त्यांना अल्पायुष्य लाभले. तेवढ्याच काळात त्यांनी इथल्या गावकुसाबाहेरील लोकांना आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा बुद्ध स्वतः स्वीकारून मुख्य प्रवाहात आणले. माणसामाणसात भेद करणारे सर्वच कर्मकांड, भेदभाव करणारे इथले धर्म नाकारले. देशातील वंचितांना कुणीतरी आपला विचार करणारा वाली आहे याची जाण झाली. त्यानंतर पुन्हा एकदा बुध्द धम्म वाढण्याची चळवळ देशभर उभी राहिली. याशिवाय अनहीलेशन ऑफ कास्ट' (जातीअंत) हा निबंध लिहून देशातील तमाम लोकांना भेदभाव रहित जीवन जगण्यासाठी एका रेषेत आणण्याचे उपाय सुचवले. जातीजातीतील दरी संपविण्यासाठी आंतरजातीय विवाह हा उत्तम पर्याय त्यांनी सुचवला. अशी स्वावलंबी, मजबूत, एकी निर्माण करणारे अनेक स्वप्न डॉ.बाबासाहेबांनी पहिली होती. परंतु त्यांची ही सगळी स्वप्ने पूर्ण होण्याच्या अगोदरच त्यांनी जगाचा निरोप घेतला. मग त्यांनी पाहिलेली स्वप्ने कोण पूर्ण करणार? हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे.

खरंच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात आपण त्यांची स्वप्ने पूर्ण करणार आहोत का? आज जे स्वतःला त्यांचे कट्टर अनुयायी म्हणून सांगतात ते काय करत आहेत? बाबासाहेबांची चळवळ कुठं आहे? त्यांनी स्थापन केलेला राजकीय पक्ष कुठं आहे? त्यांनी स्थापन केलेल्या संस्था त्यांच्या तत्वावर मार्गक्रमण करत आहेत का? असे एक ना अनेक प्रश्न माझ्यासारख्याला आज त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी सतावत आहेत. त्यासाठी केवळ एखाद्या समूहावर विसंबून न राहता आज आपण सर्वांनीच त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी झटावे लागणार आहे. देशातील तरुणांनी काळाची पावले ओळखून कार्य करावे लागेल. आज देशाच्या तरुणाईला इंटरनेट, मिडियाचे ग्रहण लागले आहे. दिवसेंदिवस तरुणांच्या आत्महत्या वाढत आहेत. ही उद्याच्या समृद्ध भारतासाठी मोठी धोक्याची घंटा आहे. शिक्षण हे केवळ नौकरीसाठीच आहे ही धारणा थांबवावी लागेल. त्यासाठी व्यावसायिक शिक्षण घेऊन प्रत्येकाने स्वावलंबी व्ह-ावेच लागेल. याच्या जोडीला देशातील जाती जातीतील वाढती कट्टरता कमी करावी लागेल. आपण सर्वांनी संवैधानिक मार्गाने आपल्या मागण्या सरकार समोर ठेवल्याच पाहिजे. त्याचबरोबर जिथे कुठे आंतरजातीय विवाह घडून येत असतील तर समाजाने मोठ्या मनाने ते स्वीकारून अशा विवाहांना समाज मान्यता दिली पाहिजे. कुठेही प्रतिष्ठा आणून ऑनर किलिंग सारखे प्रकार घडता कामा नयेत. शिवाय देशभर सर्वत्र मोठ्या ताकदीने बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करून लोकांना जगात बुद्ध धम्म कसा महान, सर्वसमावेशक, सामानता प्रस्थापित करणारा आणि कर्मकांड विरहीत आहे! हे पटवून द्यावे लागेल. त्यासाठी बुध्द धम्माचा सखोल अभ्यास करून गाव-ागावात त्यावर व्याख्याने, प्रवचने आयोजित करावी लागतील. असे झाल्यास निश्चितपणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेली स्वप्ने प्रत्यक्षात आल्याशिवाय राहणार नाहीत. नमो बुद्धाय! जय भीम!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९९५८०६४०६८

(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)

# Few Articles Published in News Papers By Dr. S.V. Rankhamb

दैनिक महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
लोकाशा
04AUG2018

४ दैनिक लोकाशा शनिवार दि. ४ ऑगस्ट २०१८

## शिक्षणाची मुल्ये आणि बाजारीकरणाची व्यवस्था



– प्रा. डॉ. संतोष रणखांब

[illegible]

कार्यारंभ
Thursday 2018/07/12

# महाराष्ट्रातील बदलते वातावरण एक आव्हान

महाराष्ट्रातील पुण्याजवळ काही दिवसापुर्वी एक अद्भुत दृश्य पाहायला मिळाले आहे. पुरंदर तालुक्यात नाझरे धरणात सोसोट्याचा वारा वाहू लागल्याने चक्क धरणातील पाणी चक्रीवादळाच्या आकाराप्रमाणे आकाशात झेपावल्यासारखे वादळ दिसले . हा प्रकार व्हिडिओमध्ये कैद करण्यात आला. हा प्रकार अतिशय गंभीर असून वातावरण बदलायचा हा मोठा संकेत आहे. वास्तविक हवेत उडणारे पाणी नसून हा वादळाचा एक विशिष्ट प्रकार आहे.



प्रा.डॉ. संतोष रणखांब

जमिनीवर कमी दाबाच्या जागेभोवती गोलगोल फिरणाऱ्या हवेमुळे चक्रीवादळामधून संरचनेस मराठी मध्ये भूर्णवात किंवा इंग्रजी भाषेत टोर्नेडो म्हणतात. भूर्णवातात एका नरसाळ्याच्या आकाराच्या चक्राची आकाशातून सुरुवात होते, ज्याचे ते एक टोक जमिनीला लागलेले असते. हे टोक खूप वेगाने एका ठिकाणाहून दुसरीकडे पळत असते. त्याच्या तडाख्यात सापडलेल्या घरे आणि इतर वस्तूंचे नुकसान होते. हे असे भूर्णवात लहान किंवा मोठे असतात, ते जमिनीवरून ताशी १७५ वेगाने सरकतात किंवा यापेक्षा कमी असतो व जमिनीवरील आकार सुमारे २५० फूट असतो. मोठे भूर्णवात ताशी ४५० किलोमीटरपेक्षा वेगाने जातात. भूर्णवात अंटार्क्टिका वगळता इतर सर्व खंडात होत असतात परंतु अमेरिकेच्या दक्षिण-मध्य भागात त्यांचे प्रमाण जास्त असते.
भारतामध्ये ८ एप्रिल १८३८ साली कलकत्त्यामध्ये भूर्णवाताची नोंद आहे. तसेच अलिकडे २६ ऑगस्ट २०१३ मध्ये रांची येथे भूर्णवाताची भारतात नोंद आहे. भारतात भूर्णवात फारसे पडत नाहीत कारण येथे जमिनीलगतच्या खालच्या स्तरात किंवा मध्यस्तरात आर्द्रतेचे प्रमाण कमी असते, हवेची अस्थिरता, वरती ढकलणारा हवेचा दाब नसतो, मोठ्या मिळताशी पडत नाही.

महाराष्ट्रात कोकण किनारपट्टी व सह्याद्रीच्या पर्वत रांगा, दख्खनचे पठार हा उंच व सपाट अशा परिस्थितीतून टोर्नेडो किंवा भूर्णवात हा घोंघावण्याचे दिसत नाही. पण अलिकडच्या दोन दशकांचा विचार करता, वातावरणात महाराष्ट्राच्या भूभागावर वेगवेगळे प्रकार नोंदवले जात आहेत. वास्तविक किल्लारी या परिसरात लातूर जिल्ह्यात झालेल्या १९९३ सालच्या भूकंपापासूनच हे बदल लक्षात घेणे आवश्यक आहे. दख्खनचे पठार म्हणून ओळखला जाणारा हा पट्टा भूकंपाच्या बाबतीत अधिक सुरक्षित समजला जात होता. परंतु त्या विध्वंसकारी भूकंपानंतर चित्र बदलत आहे. छोटे मोठे भूकंपाचे धक्के या क्षेत्रात होत आहेत. ऋतुमानाच्या साखळीत पावसाळ्यात पाऊस, हिवाळ्यात थंडी व उन्हाळ्यात उन्हाचा कडाका हे चक्र होते. आज या चक्रातही बदल पडताना दिसत आहेत. अनियमितता वाढली आहे, मोठी गारपीट, अवकाळी पावसानंतर महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यात वर्षे राहत नाही, पण अलिकडे बर्फाचा थर साचून राहतो. गारांचा मोठ्या आकार वाढल्याचेही दिसते. तापमान सरासरीपेक्षा वाढले आहे, असे लक्षात येत आहे.

वातावरण बदलाचा कोणताही परिणाम पहिल्यांदा जैवविविधतेवर होतो. वनस्पती अनेकवेळा अशा वातावरण बदलाला तोंड देताना जगण्यात अपयशी ठरतात. त्यामुळे वनस्पतींच्या परिसरातील प्रजातींच्या संख्येवर पहिल्यांदा त्याचा परिणाम होतो. सजीवसृष्टीतील अनेक प्रजाती या त्या परिसरातील वातावरणाशी अनुकूल असा बदल करून आपले जीवन जगत असतात. काही अतिशय नाजूक वनस्पती व प्राणी प्रजाती या वातावरण बदलाच्या छोट्या परिणामाशी बळी जातात. त्यानंतर त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या इतर प्रजातीवर त्याचा परिणाम होतो. मानवी प्रजातीवर फारसा प्रभाव होत नसला तरी त्या त्या परिसरात राहणाऱ्या लोकांची शारिरीक वातावरणाशी मिळती जुळती असते. जसे भारतातील उत्तरेकडील प्रदेशात गोऱ्या रंगाचे व थोडे जास्त उंचीचे लोक आढळतात, दक्षिण भारतात काळ्या रंगाचे व त्याचप्रमाणे कमी उंचीचे लोक आढळतात. पूर्वोत्तर राज्यातील लोकही वेगळे दिसतात. हा त्या परिसरातील वातावरणाशी मिळते जुळते घेण्यासाठी असलेला शरीर रचनेचा भाग असतो. वरील सर्व बाबींची विचार करता महाराष्ट्रातील वातावरणात होत असलेले बदल नैसर्गिक बाबींमुळे होत आहेत का? किंवा मानवी कृतीतून होत असलेल्या प्रदूषणाचे हे परिणाम आहेत का? किंवा दोन्हींचे संयुक्त परिणाम आहेत? याचा विचार होणे आवश्यक आहे. जैवविविधतेमध्ये वनस्पतींच्या बाबतीत घडणारे परिणाम शोधण्यासाठी वृक्षतोड व नैसर्गिक जंगल नष्ट झाल्यामुळे अडचणी येत आहे. त्यानंतर प्राण्यामध्ये वातावरणाच्या बाबतीत सर्वात जास्त संवेदनशील पाण्यातील प्रजाती असतात, सध्या पाण्यात सोडले जाणारे कारखान्यातील रासायनिक घटक, नद्यांच्या पाण्यात टाकले जाणारे विविध टिकाऊ पदार्थ, सांडपाण्यातून शहरातून व नागरी वस्त्यांमधून येणारा प्लास्टिक कचरा, शेतात वापरले जाणारे कीटकनाशके, खते पाण्यासह नदीवर बांधण्यात आलेले बंधारे व धरणे यामुळे पाण्यातील प्राण्यांच्या मूळ अधिवासावर परिणाम होतो. त्यामुळे होणारे नैसर्गिक परिणाम शोधणे अवघड असते. तसेच एखा प्रजातीमुळे असमतोलही या विविध परिणाम होतात. अनेक प्रजाती नष्ट होतात. भूकंपाच्या धक्क्याने पडलेल्या इमारतीमुळे एकदम मृत पावलेले लोक मोजता येतात पण नैसर्गिक बदलाने जास्त पावसाशी किंवा हळूच रोगांना बळी पडणारे व्यक्ती कसे मोजणार? हा प्रश्न आहे. वातावरणात बिघाडीच्या भुकंपानंतर, त्सुनामीनंतर, भुकंपाच्या [illegible] कारणामुळे काय परिणाम होत आहेत? तसेच भूभागावरील जैवविविधतेमध्ये बदल झाले आहेत का? याचा अभ्यास आता करणे क्रमप्राप्त आहे, कदाचित हे बदल मानवी समुदायाच्या प्रजातीवर गंडांतर आणू शकतात. [illegible] येथे झालेला प्रलय व त्यानंतरचे त्याचे विस्मरण भविष्याबाबत आपली बेफिकीरी दाखवते. आपणास सजग होऊन याचा अभ्यास करावा लागेल, अन्यथा हा धोका मोठा होऊ शकतो. डायनोसोर सारखी प्रजाती अशा वातावरण बदलामुळे नष्ट झाली. कदाचित मानवी प्रजातीसाठी या धोक्याची घंटा तर नाही ना? हे एक आव्हान आहे.

**Article On Impact of Climate Change in Maharashtra**

कार्यारंभ
Monday 2020/03/23



# शहिद भगतसिंहांचा इन्कलाब जिंदाबाद

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अतिशय ठळकपणे नमुद करण्यासारखी बाब म्हणजे अतिशय कोवळ्या वयात प्रचंड अभ्यास, धोरणांची स्पष्टता, देशाबद्दल आणि देशातील कष्टकरी, सामान्य लोकांच्या हितसंबधाबद्दल प्रचंड प्रेम करणारे शहिद भगतसिंह, राजगुरू व सुखदेव हे तरूण क्रांतिकारी हसत हसत इन्कलाब जिंदाबाद या घोषणा देत फासावर गेले, देशासाठी लढणे हा काही गुन्हा नाही, ब्रिटिश सरकार हे बहिरे आहे.**

त्यांना सामान्यांचा आवाज ऐकू येत नाही, म्हणून बहिऱ्यांना ऐकवण्यासाठी मोठ्या स्फोटक आवाजाची आवश्यकता असते म्हणून कोणत्याही व्यक्तींच्या जिवाला धोका पोहचवणार नाही पण आवाज मात्र मोठा होईल असा स्फोट आम्ही असेंब्लीमध्ये केला हे न्यायालयासमोर ठणकावून सांगत असतानाच शहिद यतीन्द्रनाथ दास यांच्या ६३ दिवसांच्या उपोषणानंतर हौतात्म्य पत्करले त्यानंतर जमलेल्या भारतीय नागरिकांनी इन्कलाब जिंदाबाद या घोषणा दिल्या होत्या. या घोषणांबद्दल मॉडर्न रिव्ह्यूच्या वृत्तपत्राचे संपादक रामानंद चटोपाध्याय यांनी टिका केली होती, या टिकेला भगतसिंह व बी. के. दत्त यांनी उत्तर दिले होते, त्या वेळी ते म्हणतात' आपल्या सन्माननिय नियतकालिकाच्या डिसेंबर १९२९ च्या अंकात आपण इन्कलाब जिंदाबाद या शिर्षकाचे टिपण लिहून या घोषणेला निरर्थक ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक भारतीय आपल्याकडे आदराने पहातो, आपल्यासारख्या परिपक्व विचारांच्या अनुभवी संपादकाच्या मताचे खंडन करणे, हे आमच्या दृष्टीने मोठे धार्ष्ट्याचेच होईल. तरीसुद्धा या घोषणे बाबत आमचे विचार मांडणे, हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.' या लेखामध्ये त्यांनी ही घोषणा त्यांनी स्वतः (भगतसिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी) बनवलेली नसल्याचे सांगत, प्रसिद्ध रशियन समाजवादी लेखक अप्टन सिंक्लेयर यांच्या कांदबरीतील बोस्टन आणि ऑईल या पात्रांच्या तोंडी दिलेली आहे. त्याचा अर्थ काय आहे? सशस्त्र संघर्ष सदैव चालू राहो आणि कोणतीच व्यवस्था स्थिर न राहे असा नाही किंवा समाजात अराजकता पसरावी असाही तीचा अर्थ नाही, असे स्पष्ट करतात. ते म्हणतात, इन्कलाब जिंदाबाद या शब्दाचा अर्थ आपण केवळ कोरड्या शाब्दिक स्वरूपात लावता कामा नये. या शब्दांचा उचित वा अनुचित वापर करणाऱ्या लोकांच्या हितानुसार त्याला विविध अर्थ आणि वैशिष्ट्ये जोडली जातात. क्रांतीकारकांच्या दृष्टीने हे एक पवित्र वाक्य आहे. हीच बाब आम्ही न्यायालयासमोरही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

इन्कलाबचा अर्थ स्पष्ट करताना म्हणतात अटळपणे सशस्त्र आंदोलन असाच होतो असे होत नाही, बॉम्ब आणि पिस्तुले कधी कधी क्रांती यशस्वी करण्यासाठी साधन ठरू शकतात, पण इन्कलाब या शब्दाचा अर्थ क्रांतीसाठी परिवर्तनाची इच्छा आणि अकांक्षा असा होतो, मनुष्यजातीचा आत्मा क्रांतीच्या या भावनेने ओतप्रोत भरलेला असायला पाहीजे, म्हणजे मानवाच्या प्रगतीच्या वाटेवर अडथळा निर्माण करण्यासाठी परंपरावादी शक्ती संघटीत होणार नाहीत, त्यामधून जगाला नासवण्यापासून वाचवणारी एक आदर्श व्यवस्था पुढे येऊ शकेल, हा आशय त्यावेळी क्रांतिकारक इन्कलाब जिंदाबाद ही घोषणा देतात तेव्हा त्यांना अपेक्षित असतो, असे भगतसिंग व बी. के. दत्त आपल्या पत्रातून स्पष्ट करतात. न्यायालयासमोर व लोकांसमोर इन्कलाब जिंदाबादचा अर्थ फारच सोप्या शब्दात व योग्य पद्धतीने मांडला असला तरीही, आजही प्रस्थापीत सत्तेत राहून, या लोकशाहीवादी व्यवस्थेत राहूनही जे लोक इतरांना गुलाम ठेवण्यासाठी प्रयत्न करतात, रुढीवादी विचारांनी लोकांना मानसिक गुलाम बनवणारे विचार मजबूत करण्याचा प्रयत्न करतात, ते लोक इन्कलाब जिंदाबाद ही घोषणा बदनाम करण्याचा प्रयत्न करतात पण मानवी जीवनावर व मानवी मुल्यांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या भगतसिंह, राजगुरू, सुखदेव, बी. के. दत्त, चंद्रशेखर आजाद, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या वैचारिक वारसदारांना ही घोषणा पुन्हा बुलंद करावी लागेल.

इन्कलाब जिंदाबाद.....



प्रा.डॉ.संतोष रणखांब
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जी.परभणी

**Article On Great Patriot Shahid Bhagatsingh**

# देशभक्तांबद्दल कृतज्ञता बाळगणारे क्रांतिकारी शहीद भगत सिंह

२३ मार्च १९३१ रोजी शहीद भगत सिंह, राजगुरु, सुखदेव या तीन महान क्रांतिकारकांना फाशी देण्यात आली. शहीद भगतसिंहांनी आपल्या लिखाना मधून अनेक क्रांतिकारकांची आठवण केलेली आपणास दिसून येते, मदनलाल धिंग्रा, सूफी अंबाप्रसाद, श्री बलवंतसिंह, डॉ. मथुरासिंह, शहिद कर्तारसिंग सारभा, श्री अमिरचंद, श्री अवधबिहारी, श्री भाई बालमुकुंद, श्री बसंतोकुमार विश्वास, श्री भाई भागसिंह अशा अनेक क्रांतिकारकांबद्दल भगतसिंग लिहतात, त्यांच्या या लिखानातून आपणाला अनेक बाबतीत त्यांची मते स्पष्ट जाणवतात, भारतीय लोक हे त्यांच्या देशातील महान लोकांना सन्मान देत नाहीत, ही खंत व्यक्त करतात.




सूफी अंबाप्रसादांबद्दल लिहताना ते स्पष्ट म्हणतात– ' आज भारत वर्षात किती लोकांना हे नाव माहीत आहे? किती लोक त्यांच्या आठवणींनी शोकाकुल होऊन अश्रू ढाळतात? ह्या कृतघ्न भारताने अशी कितीतरी रत्ने गमावली आहेत, पण क्षणमात्रसुद्धा दुःखाचा लवलेशही अनुभवलेला नाही.' असे सांगत त्यांच्याविषयी चान्द (फांसी अंक) नोव्हेंबर १९२८ मध्ये सुंदर लिहीणारे भगतसिंह त्यांचे आदर्श ज्यांना मानत, ज्यांचा फोटो नेहमी आपल्या सोबत ठेवायचे त्या कर्तारसिंह सारभांबद्दल याच अंकित लिहताना कर्तारसिंहांचे एक गित लिहीतात –

'सेवा देश दी जिन्दड़िए बड़ी औखी,
गल्ला करनाई ढेर सुखल्लीयां ने ।
जिन्नां देशसेवा विच पैर पाया,
उन्ना लक्ख मुसीबतां झल्लियां ने ।

म्हणजे देशसेवा करणे फार कठीण आहे, गप्पा मारणे खूप सोपे असते, ज्यांनी देशसेवेच्या मार्गावर पाय ठेवला ते लाखो संकटे झेलतात. भगतसिंग भारतातील अनेक क्रांतीकारकांचा इतिहास अभ्यासणारे व त्यांच्या विषयी इतरांना माहीती व्हावी म्हणून त्यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगणारे महान क्रांतिकारी होते.

त्यांनी आपल्या एका कोर्टासमोरील निवेदनात स्पष्ट सांगितले होते, 'आमचे हे नविन आंदोलन छत्रपती शिवाजी महाराज, गुरु गोविंदसिंह, कमाल पाशा, रजा खान, वाशिंग्टन, गॅरिबाल्डी, लेनिन आणि लाफायतें सारख्या आदर्शांनी प्रेरित झालेले आहे. भगतसिंगांना प्रेरणा देणारे प्रेरणास्थान हे वैचारिक समानता असणारे आहेत, मानवतेचे व माणूसकीचे राज्य माणसांसाठी निर्माण करणे हा शहिद भगतसिंह व त्यांच्या सहकाऱ्यांचा उद्देश आगदी वयाच्या २३ व्या वर्षी निर्माण होण्याचे कारण म्हणजे भारतातील व भारताबाहेरील जागतीक स्तरावरील क्रांतिकारकांबद्दल प्रचंड आदर, त्यांच्या विचारांचा बारकाईने केलेला अभ्यास हे शहिद भगतसिंहांच्या लिखानातून, वर्तनातून व त्यांच्या दिलेल्या निवेदनांमधून आपणास दिसून येते. भारतातील कष्टकरी लोकांसाठी समाजवादी, धर्मनिरपेक्ष, स्वातंत्र व स्वर्गाच्या संकल्पनेसारखा सुंदर भारत निर्माण करण्यासाठी अनेक भारतीय क्रांतिकारकांनी दिलेला लढा अभ्यासून त्यासाठी स्वतःच्या प्राणांची आहुती देणारे शहिद भगतसिंह, राजगुरु, सुखदेव व त्यांचे सर्वच हिंदुस्तान समाजवादी रिपब्लिकन आर्मीचे सहकारी यांची प्रत्येक भारतीयांना आठवण करावी कारण २४ ऐवजी २३ मार्च रोजी लाहौर तुरुंगांत फाशी देऊन रावी नदिच्या तिरावर गुपचुप अंत्यसंस्कार करणारे साम्राज्यवादी ब्रिटिश सरकारचे अधिकारी या भारतीय सुपुत्राला शरीराने संपवू शकले पण विचाराने मात्र ते आजही खऱ्या भारतीयांच्या ह्रदयात जीवंत आहेत, त्यांचा इन्कलाब जिंदाबाद हा नारा मोठमोठ्या अत्याचारी विचारांना हादरवतो.

२३ मार्च शहिद दिनानिमित्त या महान क्रांतिकारकांना विनम्र अभिवादन..........



प्रा. डॉ. संतोष रणखांब,

Article On Great Patriot Shahid Bhagatsingh




डॉ. संतोष रणखांब


भारतातील दाट लोकसंख्या, भारतीय समाज व्यवस्थेतील उत्सवप्रियता, तसेच आजार अंगावर सहन करण्याची प्रवृत्ती, अपुरी वैद्यकीय उपचार साधने व सध्या अपुऱ्या साधनांवर चालणाऱ्या संशोधन संस्था ही स्थिती भारतासारख्या विस्तारलेल्या देशातील जनतेच्या हितासाठी योग्य नाहीत. करोना महामारीच्या निमित्ताने भारतीय आरोग्य व्यवस्थेचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

# महामारीचा सामना करताना

आपला भारत देश विविध भाषा, संस्कृती व भौगोलिक स्थिती यांचे मिश्रण आहे. देशाच्या विविध प्रांतांची भौगोलिक परिस्थिती व वातावरण वेगवेगळे आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जैवभौगोलिक स्थिती वेगवेगळी आहे. बर्फाळ प्रदेश, वाळवंटी प्रदेश, समुद्र किनारपट्टी, पठार व डोंगराळ प्रदेश असे जवळपास सर्व प्रकार पहावयास मिळतात. त्यामुळे भारतीय लोकांची शारीरिक संरचना ही वेगवेगळी दिसते. या नैसर्गिक विविधतेबरोबरच कृत्रिम विविधताही खूप आहे. विविध जाती, विविध धर्म, विविध पंथ, गरीब, श्रीमंत, मध्यमवर्ग, शेतकरी, शेतमजूर, कामगार ही अशी विविधता आहेच. सध्याच्या करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विचार करता भारतीयांनी यापूर्वी अनेक संकटांना तोंड दिलेले आहे. आज संपूर्ण जग करोनाच्या महामारीत सापडले आहे. या संकटाला सामोरे जाताना भारतातील दाट लोकसंख्या, भारतीय समाज व्यवस्थेतील उत्सवप्रियता, तसेच आजार अंगावर सहन करण्याची प्रवृत्ती, अपुरी वैद्यकीय उपचार साधने व सध्या अपुऱ्या साधनांवर चालणाऱ्या संशोधन संस्था ही स्थिती भारतासारख्या विस्तारलेल्या देशातील जनतेच्या हितासाठी योग्य नाहीत. करोना महामारीच्या निमित्ताने भारतीय आरोग्य व्यवस्थेचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

भारत देश जागतिक आरोग्य सेवेच्या प्रशंसाप्राप्त देशाच्या यादीत नसेल तर, कारण सुस्पष्ट आहे. जेव्हा जगातल्या अनुक्रमे शंभर विद्यापीठांच्या यादीत भारतातले एकही विद्यापीठ नसते तेव्हा त्याचे कारण एकूण अर्थसंकल्पापैकी आपण करत असलेला खर्चाशी निगडित आहे. तेच या आरोग्य सुविधांबाबत पहायला मिळेल. भारताच्या एकूण राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या (जीडीपी) १.२८ टक्के खर्च हा आरोग्य सेवेवर होतो. जगात आघाडीवर असलेला फ्रान्ससारखा देश जीडीपीच्या १९.३ टक्के व इतर प्रगत देशांपैकी अमेरिका जीडीपीच्या १७.१ टक्के, जर्मनी १०.६ टक्के, कॅनडा १० टक्के, क्युबा १३.४३ टक्के, इटली १६.१८ टक्के, चीन ७ टक्के आरोग्य सेवेवर खर्च करतात. भारतातील संशोधन व विकास कार्यक्रमासाठी फक्त ०.७ टक्के खर्च केला जातो. हा खर्च ब्राझील, रशिया व चीन यांच्यापेक्षा खूप कमी आहे. सध्या तरी इतर विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारतातील करोना महामारीची स्थिती आटोक्यात दिसते. शासन त्यांच्या स्तरावर प्रयत्न करत आहे. इतर यंत्रणा व त्यातील सहभागी मनुष्यबळ करोनाचा मुकाबला करत आहे. परंतु, पुढे काय होईल, हे आत्ताच सांगता येणार नाही. गेल्या तीन दशकातील भारताची खासगी क्षेत्राकडे वेगाने सुरू असलेली वाटचाल व आक्रसत जाणारे सार्वजनिक (शासकीय) क्षेत्र यामुळे या महामारीचा किंवा भविष्यातील अशा कोणत्याही संकटाचा मुकाबला करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे की नाही, अशी शंका घेण्यास वाव आहे.

फक्त सार्वजनिक आरोग्य सेवाच बळकट करून चालत नाही, तर विविध क्षेत्रातील संशोधन संस्थाही बळकट कराव्या लागणार आहेत. सध्या भारतात सीएसआयआर, ईएसआयसी, आयसीएआर, एमओईएफसीडब्ल्यू, डीबीटी, डीएसटी, आयसीएमआर, डीएई, एमएचआरडी इत्यादी संशोधन संस्था कार्यरत आहेत. पण, या संस्थांमधील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. ती भरण्याऐवजी सद्यस्थितीत या संस्थांचे खच्चीकरण व खासगीकरणाकडे वाटचाल सुरू झाली आहे. करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर या संशोधन संस्थांना अधिक बळकट करण्याची गरज आहे. पदे भरणे, विविध शिष्यवृत्त्यांद्वारे नवीन संशोधनास चालना देणे आवश्यक आहे.

सर्वसामान्यतः १३० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य, बेरोजगारी आहे. त्यातच शिक्षण व आरोग्य या सुविधा शासनाने मोफत व आवश्यक त्या प्रमाणात पुरवणे आवश्यक असताना भारत सरकार कल्याणकारी राज्य संकल्पनेतून बाहेर पडून १९९०च्या दशकानंतर खुल्या अर्थव्यवस्थेत गेले. त्यातून खासगीकरणाच्या धोरणाने देशाची सर्वच सार्वजनिक व्यवस्था मोडित काढण्याचे काम सुरू झाले. जगात कोठेच नसेल असे निर्गुंतवणूक मंत्रालय निर्माण करून शासकीय मालमत्ता खासगी केल्या गेल्या. त्यात आरोग्य, शिक्षण व संशोधन या व्यवस्था दुर्लक्षित केल्या गेल्या. आता त्यांचे मोठ्या प्रमाणावर खच्चीकरण सुरू आहे. ज्यामध्ये अतिशय सामान्य आर्थिक स्तर असणाऱ्यांना या सेवा मिळत नाहीत. भारतीय म्हणून सामान्यांचा विचार करणे म्हणजे त्यांना आरोग्य, शिक्षण यांच्या दर्जेदार सुविधा शासनाकडून मिळून, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विविध संकटावर मात करण्यासाठी संशोधनाला मोठी चालना दिली गेली पाहिजे, तसेच विकासाचे विविध आराखडे तयार करून अल्पकालीन धोरणे व दूरगामी धोरणे शासनाच्या धोरण आखणाऱ्यांनी आखले पाहिजे, तरच भारताचे (म्हणजेच येथील बहुसंख्य सामान्य, मध्यमवर्गीय व गरीब जनता) आरोग्य सुरक्षित राहील. त्यांचा भविष्यात विकास होईल. आरोग्याची सरकारी सुविधा मजबूत करून त्याचा वापर येथील सामान्य जनतेच्या हितासाठी केला पाहिजे. संशोधनाला चालना देऊन देशाचा विकास घडविला तरच भविष्यातही आपण करोना किंवा कशाचीही साथ आली त्याचा समर्थपणे मुकाबला करू शकू.

**Articles - When Facing an Epidemic – Maharashtra Times 29 March 2020**

प्रा. डॉ. संतोष रणखांब

# रक्ताने माखलेला इतिहास...




**भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सर्वात रक्तरंजित घटनांपैकी एक असणाऱ्या जालियनवाला बाग हत्याकांडाला सोमवारी (१३ एप्रिल) रोजी १०१ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त...**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक महान क्रांतीकारकांनी आपले बलिदान देऊन स्वातंत्र्य मिळवले, स्वातंत्र्याच्या मागणीसाठी व इंग्रजांच्या अन्यायी, अत्याचारी कार्यशैलीविरोधात भारतात मोठा असंतोष होता. सर्व भारतीय या लढ्यात त्वेषाने लढत होते. या लढ्यात इंग्रजांच्या क्रौर्याने मानवतेच्या सर्व सीमा ओलांडल्या होत्या. या क्रौर्याचे सर्वोच्च उदाहरण म्हणून पाहताना भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील रक्ताने माखलेला दिवस म्हणून १३ एप्रिल १९१९ या दिवसाकडे पाहावे लागेल. या दिवशी पंजाबातील अमृतसर येथे जालियनवाला बागेत जमलेल्या निःशस्त्र भारतीय नागरिकांवर इंग्रज सैन्याने गोळीबार केला. त्यात शेकडोत्दोन हजार नागरिकांचा मृत्यू झाला. त्यात महिला आणि लहान मुलांचाही समावेश होता.

जालियनवाला बाग हत्याकांड १३ एप्रिल रोजी घडले असले, तरी या हत्याकांडाची पार्श्वभूमी अशी, की डॉ. सत्यपाल व डॉ. सैफुद्दीन किचलू या दोन नेत्यांना इंग्रज सरकारने अटक केली होती. भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या या दोन नेत्यांना अटक करून सरकारने नेमके कोणत्या ठिकाणी ठेवले आहे, हे सरकार लोकांना सांगत नव्हते. अमृतसरमधील नागरिकांनी एकत्र येत या दोन नेत्यांच्या अटकेचा निषेध करत असताना हिंसक वळण घेतले. अमृतसर शहरात १० एप्रिल १९१९ रोजी जाळपोळ, तोडफोड करत नागरिकांनी ब्रिटिश नागरिकांवर राग व्यक्त करायला सुरुवात केली. या वेळी उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे शाळा बंद करण्यासाठी जाणाऱ्या ब्रिटिश शिक्षिकेला काही लोकांनी अपमानीत केले. त्यामुळे त्या दिवशीच ज्या कच्चा कुरीयन भागात हे घडले, तेथे क्रूरकर्मा जनरल डायरने अनेक लोकांना गुडघ्यावर रांगत चालण्याची शिक्षा देऊन मारहाण केली. त्यानंतरही त्याचा क्रूरपणा शांत झाला नाही.

लोकांचा राग अन्यायामुळे धुमसत होता, तसेच ब्रिटिश नागरिकांना लक्ष्य केल्यामुळे इंग्रज अधिकारी मनात राग धरून होते. या कारणांनी अमृतसर शहरात संचारबंदी लागू केली होती, तरीही १२ एप्रिल १९१९ रोजी डॉ. सैफुद्दीन किचलू यांचे सहकारी हंसराज यांच्या पुढाकाराने धाब खाटिकान या हिंदू कॉलेजमध्ये प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. त्या बैठकीत १३ एप्रिल रविवार रोजी डॉ. महमद बशीर यांच्या पुढाकाराने व लाला कन्हैयालाल भाटीया यांच्या अध्यक्षतेखाली सभा जालियनवाला बागेत घेण्याचे ठरले. याच दिवशी बैसाखी हा पंजाबातील पवित्र सण होता, त्या निमित्ताने ग्रामीण भागातून अनेक लोक अमृतसर शहरात जत्रेच्या निमित्ताने येत असत, तसेच ते त्याही दिवशी आले, त्यांना संचारबंदीची माहिती नव्हती. त्यावेळी पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर मायकेल ओडवायर, जनरल डायर व कर्नल रेडिनाल्ड एडवर्ड यांनी २५वी सैन्याची पंजाबी तुकडी अमृतसर येथे आणून ठेवली. बाहेरून येणारे ग्रामीण नागरिक, त्यांचे कुटुंबीय आत येऊ दिले, त्यातच एका बाजूला सभा सुरू झाल्यानंतर पंजाबी तुकडीतील पंजाबी, गोरखा, बलुची हे ९० सैनिक व दोन सैनिकी सशस्त्र गाड्यातील ५० सैनिक आणले. साडेसहा ते सात एकर परिसरातील जालियनवाला बागेत वीस हजार लोक जमा झाले होते, त्यांना संचारबंदीची सूचना दिली. बाहेर जाण्यासाठी लोक वळणार तोच या बागेचे अरुंद दार बंद करून थेट गोळीबाराला सुरुवात केली, तेथे अतिशय अमानुषपणे १६५० गोळ्या झाडण्यात आल्या. त्यातील १५१६ गोळ्या मृतदेहांवर सापडल्या. जीव वाचवण्यासाठी काही जणांनी विहिरीत उड्या मारल्या, त्यात १२० जणांचा मृत्यू झाला. तर चेंगराचेंगरीतही काही जणांचा मृत्यू झाला. जनरल डायर या विकृत इंग्रज अधिकारी व त्याच्या सहकाऱ्यांनी अशा पद्धतीने दोन हजार जणांचे बळी घेतले.

त्याकाळात झालेल्या या अमानुष कत्तलीच्या प्रकाराचा हाऊस ऑफ कॉमनमध्ये २४७ विरुद्ध ५३७ या मतांनी निषेध केला गेला, पण ब्रिटिश सत्तेतील अमिर उमराव व त्यावेळचा नोबेल विजेता रुडयार्ड किपलिंग याने या हत्याकांडाचे समर्थन करून डायरसारख्या क्रूरकर्म्यांला पैशांची थैली भेट दिली. त्याचा सन्मान केला. नंतर जनरल डायरला मेंदूत रक्तस्राव झाला २३ जुलै १९२७ रोजी त्याचा मृत्यू झाला। तर १३ मार्च १९४० ला मायकेल ओडवायरचा लंडनच्या कॅक्स्टन सभागृहात भारतीय क्रांतिकारक उधमसिंगांनी गोळ्या घालून वध केला.

तत्कालीन इंग्रज सरकारने मृतांचा आकडा ३७९ असा खोटा सांगितला होता, त्यामुळे त्यानंतर सत्यशोधन समिती स्थापन करून ही संख्या १५२६ असल्याचे लक्षात आणून दिले गेले, तरीही भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने १४ ऑक्टोबर १९९७ रोजी महाराणी एलिझाबेथ व राजपुत्र फिलीप यांनी भेट दिली. तेव्हा हा राजपुत्र फिलीप भारतीय अधिकाऱ्याला दोन हजार ही मृतांची संख्या वाचून म्हणतो की, 'ही जरा अतिशयोक्ती वाटत नाही का?'

या हत्याकांडामुळे अनेक भारतीय तरुण पेटून उठले, शहीद भगतसिंगांनी तर तेथील माती दुसऱ्या दिवशी बाटलीत भरून आणून घरात ठेवली होती, त्यातून नंतर त्यांनी मोठी प्रेरणा घेतली होती, उधमसिंगांसारखा तरुण इंग्लंडमध्ये जाऊन ओडवायरवर सभागृहात गोळ्या घालून वध करतो, ज्या हिंदू, मुस्लिम, शिख अशा सर्व भारतीयांनी बैसाखीच्या पवित्र सणाच्या दिवशी या देशासाठी बलिदान दिले, त्यांच्या रक्ताने मिळालेले हे स्वातंत्र्य आपण टिकवले पाहिजे, या देशाला विकसित बनवण्यासाठी या जालीयनवाला बागेतील रक्ताने माखलेल्या इतिहासाच्या धड्याचे स्मरण केले पाहिजे, भारतीय राष्ट्रीय एकात्मता जोपासली पाहिजे, त्या जालीयनवाला बागेत आज शहीद झालेल्या सर्व दोन हजार भारतीयांना विनम्र अभिवादन केलेच पाहिजे.

**Maharashtra Times 13 April 2020 On Jallianwala Bagh Massacre**

# DR. Mukundraj Patil has written number of Articles in the News Papers



**बोलबच्चन**



वाढीव आरक्षणासाठी राज्यघटनेत बदल करावा लागेल, पण त्यासाठी राजकीय पक्षांमध्ये एकमत होत नाही. महाराष्ट्रातही काही नेत्यांनी विरोध दर्शविला आहे. शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाबाबत सर्वांनी विचार करून संमत तोडगा काढला पाहिजे.

–नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री



कागदी घोडे नाचवणे बंद करून लवकरात लवकर मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम करा. लोकांचा उद्रेक होऊ देऊ नका, नवी नक्षली चळवळ सुरू करायला भाग पाडू नका. हात जोडून विनंती करतो, मराठा समाजाला आरक्षण द्या, अन्यथा अनर्थ होईल. मराठा समाजाचा अंत पाहू नये.

–उदयनराजे भोसले, खासदार



इतरांच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. मात्र, सरक[ार] निर्णय घेण्यासाठी तयार नाही. याउलट आंदोलने अधि[क] होऊन कटुता कशी वाढेल, आंदोलकांना एकटे पाडून इतरां[ना] संघटित करून त्याचा राजकीय फायदा घ्यावा, अस[ा] राज्यकर्त्यांचा उद्देश आहे काय?

–शरद पवार, माजी कृषीमंत्री

Article on Corporate farming

# कॉर्पोरेट शेती

**शेती व शेती व्यवसायावर कंपन्यांच्या प्रभावाचे वर्णन करण्यासाठी 'कार्पोरेट शेती' हि संकल्पना वापरली जाते. यामध्ये कंपन्यांनी शेतीवर मालकी हक्क (विकत घेवून अथवा भाड्याने घेवून) प्रस्थापित करणे, शेती उत्पादनांची विक्री करणे, शेतीचे शिक्षण, संशोधन या संबंधी गुंतवणूक करणे व ध्येय धोरण ठरवणे या सर्वांचा समावेश होतो.**

उद्योगपतींनी शेतीमध्ये गुंतवणूक करून 'कॉर्पोरेट शेती करावी व ती कशी गरजेची आहे आणि त्यामुळे शेतकऱ्याचा कसा फायदा होईल याबद्दल केंद्रीय अन्नप्रक्रिया मंत्री हरसिमरत कौर बादल यांनी सत्तेत आल्यावरोबर वक्तव्य केले होते ते ऐकून काही प्रतिक्रिया येतील असे वाटले होते पण त्याला कोणीही गांभीर्याने घेतलेले दिसले नाही ना शेतकऱ्यांनी ना शेतकरी संघटनांनी. कार्पोरेट शेतीमुळे शेतकऱ्यांना आणि महागाईने होरपळणाऱ्या सामान्य जनतेला किती फायदा होणार आहे तो काळच ठरवेल पण हे दोन्ही घटक यामध्ये भरडलेच जातील असे माझे मत आहे. भारतामध्ये कार्पोरेट शेती रुजवण्यासाठी राजकीय यंत्रणा मात्र जोमाने कामाला लागलेली आपणास पहावयास मिळत आहे. शेतजमीन भाड्याने देणे कायदेशीर करण्याचे धोरण केंद्र शासनाने आखले असून त्यासाठी विशेष समितेची स्थापना केली आहे. नीती आयोगाचे तत्कालीन उपाध्यक्ष अरविंद पनगडीया यांनी सुद्धा याचे समर्थन केले आहे. या समितेची स्थापना करून शासनाने कार्पोरेट शेतीकडे पहिले पाऊल टाकले आहे असे सर्वांना वाटत आहे. पण सध्याची शेतकऱ्यांची परिस्थिती शेतीसंबंधीत, शासकीय, राजकीय व आर्थिक धोरण यांचा विचार करता शेतकऱ्यांना कार्पोरेट शेतीसाठी तयार (मजबूर) करण्याची योजना खूप आगोदर पासूनच चालू आहे असंच वाटतं आणि शेती भाडेतत्वावर देणे कायदेशीर करणे हा त्यामधील एक टप्पा आहे. शेतकऱ्यांची आजची जी अवस्था आहे यास कोण कारणीभूत आहे...? शेतीविषयक शासकीय धोरण चुकतेय की कार्पोरेट शेतीच्या आगमनासाठी पोषक वातावरण तयार व्हावे म्हणून मुद्दाम आखलेली योजना आहे..? असे एक ना अनेक प्रश्न यानिमित्ताने समोर येतात.

१९७० च्या दशकात जेव्हा हरितक्रांती झाली त्यावेळी जे शेती तंत्रज्ञान संशोधनात कार्य झाले त्यानंतर शेती संशोधनात म्हणावे तेवढे कार्य झाले नाही त्यामुळे शेती उत्पादनात म्हणावी तेवढी वाढ होत नाही. यामागचे महत्वाचे कारण म्हणजे कृषी संशोधनाकडे शासनाने केलेले दुर्लक्ष हे होय भारतामध्ये कृषी संशोधनावर कृषी जोडीपीच्या केवळ ३१ टक्के एवढा खर्च केला जातो. चीनचा हाच खर्च ६५ टक्के एवढा आहे. आपल्यापेक्षा बांग्लादेश शेती संशोधनावर जास्त खर्च (३८ टक्के) करतो. परिणामी कृषीचा राष्ट्रीय जोडीपिमधील वाटा जो भारत स्वातंत्र झाला तेव्हा १/२ एवढा होता तो १/५ एवढा कमी झाला आहे. एकीकडे आपण शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे म्हणतो आणि त्याच क्षेत्राची अशी दूरावस्था करून आपण प्रगत कशे होऊ शकतो. कृषी उत्पादनात सरासरी वार्षिक वाढ फक्त ५% झालेली पहावयास मिळते मा. पंतप्रधानांनी २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली आहे त्यासाठी वार्षिक १२% वाढ अपेक्षित आहे यावरून ह्या घोषणेमध्ये किती तथ्य आहे हे पहावयास मिळते. शेतीमध्ये कोर्पोरेट क्षेत्राची गुंतवणूक ही संकल्पना आता समोर येत असली तरी शेतीच्या बाबतीत कोर्पोरेट हस्तक्षेप मात्र आगोदर पासुनंच आहे. त्याशिवायच हवामानाचे अंदाज वारंवार चुकतात का? आज हवामान खाते हा खिल्ली उडवण्याचा विषय झाला आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात जेथे जास्तीत जास्त शेती निसर्गावर अवलंबून आहे तेथे ही बाब खूप गंभीर आहे. दरवर्षी एप्रिल–मे महिन्यात हवामान खात्याचा अंदाज असतो यावर्षी चांगला पाऊस... मान्सूनचे वेळेवर आगमन..ई. शेतकरी बिचारा खत–बियाणे खरेदी करून पावसाची वाट पाहत बसतो.... वास्तवात पाऊस वेळेवर येत नाही मग काहीतरी कारण दिली जातात...खरंच आपलं हवामान खाते एवढे मागास आहे का..? एकीकडे इस्रोची प्रगती पाहता तंत्रज्ञान व ज्ञानाची आपल्याकडे कमतरता आहे असे वाटत नाही मग त्यामागे कार्पोरेट हस्तक्षेप (खात व बियाणे कंपन्या) असावा असे वारंवार वाटते. ज्यावेळी कार्पोरेट शेती भारतात रुजेल आणि कार्पोरेट क्षेत्र शेतीमध्ये गुंतवणूक करायला लागतील त्यावेळी हवामानाचे अंदाज अचूक ठरतील हे वेगळे सांगायला नको.

आता राज्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) कायद्यामध्ये बदल करून 'आदर्श मंदी कायदा' येवू घातला आहे ज्यामध्ये छोटे व्यापार, खाजगी मार्केट, ई–ट्रेडिंग द्वारे शेतकऱ्यांना व ग्राहकांना मालाची खरेदी –विक्री करण्याची परवानगी देण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना कोणत्याही वेळी कोणत्याही ठिकाणी उत्पादन विक्री करण्याचा अधिकार मिळणार आहे.

एपीएमसी कायद्यात केलेले हे बदल आणि कार्पोरेट शेतीचे होऊ घातलेले आगमन याच्या टाईमिंगचा फायदा कोणाला होईल पारंपारिक शेतकरी की कार्पोरेट शेतकरी हे येणारा काळच ठरवेल पण पारंपारी शेतकऱ्यांची एकूण परिस्थिती पाहता कार्पोरेट शेतकरीच याचा फायदा (गैर) उठवतील असेच चित्र आहे. आज सुध्दा शेती भाडे तत्वावर (ठोक्याने) दिली जाते पण यामुळे शेतीमालकाला पाच ते दहा हजार प्रती एकर एवढा मोबदला मिळतो कार्पोरेट क्षेत्रातील मंडळी (अंबाणी, आदानी, टाटा, बिर्ला इ.) हा दर

वीस ते पंचवीस हजारापर्यंत वाढवतील पण त्यांनी त्यात केलेले उत्पादन ते काही आठवडी बाजारात किंवा आडतीवर विकणार नाहीत तर त्यांच्या मोल्समध्ये ते विकतील पर्यायाने १५ रु किलोची ज्वारी आपणास १५० रु ला विकली गेली १० रु चा उसाच्या रसाचा पेला १००रु ला मिळाला तर नवल वाटू नये. रिलायंस फ्रेश यां फळ व भाज्या विकणाऱ्या मोलमध्ये आंजचे भाव पाहता याची कल्पना येते उदा. कारले ७० रु. प्रती किलो, मिरची ६९ रु. प्रती किलो, टमाटर ४० रु प्रति किलो (जी की सरासरी बाजारभावापेक्षा दुपटी पेक्षा जास्त आहे).

थोडक्यात काय तर शेतकरी कोंडीत अडकला जाणार आहे स्वतः शेती परवडत नाही म्हणून शेती भाड्याने द्यावी तर येणाऱ्या पैशात उपजीविका भागेल की नाही याची चिंता असेल सामान्य नागरिक जे आजंच महागाईने त्रस्त आहेत. त्यांना 'कोर्पोरेट रेट' परवडतील का...? याचा विचार सर्वांनी करणे गरजेचे आहे.

मायबाप सरकारने स्वातंत्र्यानंतर औद्योगिक विकासावर जेवढा भर दिलेला आहे तेवढाच भर जर शेती संशोधन व त्याचे उपयोजन यावर दिला, शेतकऱ्याला त्याचा उद्पादन खर्चावर आधारित हमीभाव दिला तर शेती व शेतकरी यामध्ये आजपर्यंत जो ऋणानुबंध राहिलेला आहे तो टिकून राहील. बळीराजाने सुद्धा काळानुरूप स्वत:मध्ये बदल करून शेतीमध्ये येवू घातलेल्या 'कार्पोरेट' रुपी वामनाचे आगमन कसे रोखता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे.



प्रा.डॉ.मुकुन्दराज पाटील

मो. ९६५७७००२३७

# जिकडेतिकडे चोहीकडे दुष्काळाचे सावट

Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin:-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani (MS)

शंभु टाईम्स

सोमवार दि. ८ ऑगस्ट २०१६

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin:-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

# कृषीविषयक सल्ला.

लागवडीपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे आता पाऊस उघडीप दिली की कापसावर बऱ्याच रोगांची लागण होण्याची शक्यता बळावते त्यापैकी मर, कवडी, पानावरील ठिपके, बॅक्टो रियल ब्लाईट ही रोग आहेत. त्यामुळे या रोगांचे त्वरित नियंत्रण करून होणारे नुकसान टाळता येईल.

मर – पाऊस जास्त झाल्यास व पाण्याचा निचरा योग्य नसल्यामुळे मुळांची क्रियाशीलता कमी होते, त्यामुळे पाने मलूल होतात व गळतात. त्यामुळे जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी त्यातून सऱ्या काढाव्यात. प्रभावित झाडांच्या बुडाला त्वरित कॉपर ऑक्सि क्लोराईडचे (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) द्रावण टाकावे. रोगग्रस्त झाडांच्या खोडाभोवतालची माती पायाने दाबून घ्यावी.

कवडी रोग (ॲन्थ्रकनोज)– हा रोग Colletotrichum gossypii या बुरशीमुळे होतो. रोगाची लक्षणे पिकाच्या सर्व अवस्थेत आढळतात. सुरुवातीला पानावर तपकिरी काळ्या रंगाचे ठिपके दिसतात, कालांतराने अशी पाने गळतात. रोगाची लागण बोंडांना झाल्यास बोंडांवर काळपट करड्या रंगाचे व किंचित खोलगट चट्टे पडतात. अशी बोंडे अर्धवट उमलतात. कापूस घट्ट चिकटून राहतो व त्याचा कवडीसारख्या गुठळीत रूपांतर होते. म्हणून याला कवडी रोग म्हणतात. कापसाचा रंग पिवळसर तपकिरी होऊन त्याची धाग्याची प्रत बिघडते.

रोगजंतू बियाण्यात तसेच जमिनीत रोगट झाडाच्या अवशेषात राहतात. योग्य वातावरणात सक्रिय होऊन रोगाची लागण होते. रोगाचा प्रसार पाण्यातून व हवेतून होतो. बोंडे पक्व होण्याच्या काळात ढगाळ पावसाळी वातावरण असल्यास १२५० ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोवराईड (०.२५ तीव्रतेचे) किंवा १२५० ग्रॅम झायनेब प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारावे. शेतातील पिकांचे रोगट अवशेष जाळून नष्ट करावेत आणि शेतीमध्ये दरवर्षी पीक बदल करावा.

पानावरील ठिपके (अल्टरनेरिया करपा) – lternaria या बुरशीमुळे पानावर ठिपके किंवा मोठे चट्टे आढळून येतात. पानावर सुरवातीस गोलाकार, तपकिरी रंगाचे लहान ठिपके येतात. पुढे हे एकमेकांत मिसळून ते मोठे होतात. रोगाची लागण रोगग्रस्त झाडांचे अवशेष (पालापाचोळा व बोंडे) यामुळे होतो. रोगाचा प्रसार हवेतून होतो. रोगाच्या नियंत्रणासाठी वेळीच रोगट व गळालेली पाने वेचून जाळून टाकावीत. १२० मि.लि. सुडोमोनास फ्लुरोसन्स प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ३०, ६० व ९० दिवसांनी फवारणी करावी. यामुळे जिवाणूजन्य करपा व ठिपके या दोन्ही रोगांचे नियंत्रण होते.

प्रा. डॉ. एम. बी. पाटील

वनस्पतीशास्त्र विभाग, कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ जि. परभणी

PRINC...
Late Ramesh Wa...
(ACS) College, S...
Dist. Parbhani.

* Farmers are informed about the incidence of Diseases on cotton and precautionary / Preventive measures are suggested. *

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin:-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani

farmers Feedback ↓

## पाथरी तालुक्यातील बातम्यांना प्राधान्य द्यावे

प्रति,
संपादक साहेब,
सा. शंभु टाईम्स

स.न.वि.वि. पत्रास कारण की, आपण आपले शंभु टाईम्स् वृत्तपत्र आमच्या वाचनालयास पाठवल्याबद्दल आपले आभार व आपल्या वृत्तपत्रामधुन परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील वृत्तांना विशेष प्रसिद्धी दिल्यामुळे आम्हाला ग्रामीण भागातील घडामोडी कळत आहेत, तसेच सोनपेठच्या रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. याबद्दल दिलेल्या बातम्या वाचुन अतिशय आश्चर्य वाटते की, खरोखरच या विज्ञान युगात आपण सर्वजन कोणत्या काळातले जीवन जगत आहोत. तसेच सर्वसामान्य माणसांच्या समस्यांबरोबरच मागील अंकात आपण सुरू केलेला कृषि विषयक सल्ला हे सदर अतिशय चांगले व उपयुक्त वाटते कारण मागील आठवड्यातील अंक हाती पडत असताना आम्हा सर्व शेतकऱ्यांची मुगावर पडलेल्या रोगाविषयी चर्चा सुरू होती आणि त्यातच हा कृषि विषयक सल्ला वाचला आणि त्याचा वापर केल्यानंतर आम्हाला उपयोग झाला याबद्दल आपले व सदराचे लेखक प्रा. डॉ. एम. बी. पाटील यांचे सर्व निवळी (गं.) शेतकरी मंडळी विशेष आभारी आहोत. आपल्या अंकात पाथरी तालुक्यातील घडामोडींनाही विशेष स्थान द्यावे म्हणजे अंक आमच्यासाठीही वाचनिय होईल. धन्यवाद!

आपला एक वाचक
उद्धवराव लिपने निवळी (गं.) ता. पाथरी जि. परभणी

## कृषीविषयक सल्ला.

लागवडीपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे आता पाऊस उघडीप दिली की कापसावर बऱ्याच रोगांची लागण होण्याची शक्यता बळावते त्यापैकी मर, कवडी, पानावरील ठिपके, बॅक्टो रियल ब्लाईट ही रोग आहेत. त्यामुळे या रोगांचे त्वरित नियंत्रण करून होणारे नुकसान टाळता येईल.

मर – पाऊस जास्त झाल्यास व पाण्याचा निचरा योग्य नसल्यामुळे मुळांची क्रियाशीलता कमी होते, त्यामुळे पाने मलूल होतात व गळतात. त्यामुळे जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी त्यातून सऱ्या काढाव्यात. प्रभावित झाडांच्या बुडाला त्वरित कॉपर ऑक्सि क्लोराईडचे (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) द्रावण टाकावे. रोगग्रस्त झाडांच्या खोडाभोवतालची माती पायाने दाबून घ्यावी.

कवडी रोग (ॲन्थ्रकनोज)– हा रोग Colletotrichum gossypii या बुरशीमुळे होतो. रोगाची लक्षणे पिकाच्या सर्व अवस्थेत आढळतात. सुरुवातीला पानावर तपकिरी काळ्या रंगाचे ठिपके दिसतात, कालांतराने अशी पाने गळतात. रोगाची लागण बोंडांना झाल्यास बोंडांवर काळपट करड्या रंगाचे व किंचित खोलगट चट्टे पडतात. अशी बोंडे अर्धवट उमलतात. कापूस घट्ट चिकटून राहतो व त्याचा कवडीसारख्या गुठळीत रूपांतर होते. म्हणून याला कवडी रोग म्हणतात. कापसाचा रंग पिवळसर तपकिरी होऊन त्याची धाग्याची प्रत बिघडते.

रोगजंतू बियाण्यात तसेच जमिनीत रोगट झाडाच्या अवशेषात राहतात. योग्य वातावरणात सक्रिय होऊन रोगाची लागण होते. रोगाचा प्रसार पाण्यातून व हवेतून होतो. बोंडे पक्व होण्याच्या काळात ढगाळ पावसाळी वातावरण असल्यास १२५० ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोवराईड (०.२५ तीव्रतेचे) किंवा १२५० ग्रॅम झायनेब प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारावे. शेतातील पिकांचे रोगट अवशेष जाळून नष्ट करावेत आणि शेतीमध्ये दरवर्षी पीक बदल करावा.

पानावरील ठिपके (अल्टरनेरिया करपा) – lternaria या बुरशीमुळे पानावर ठिपके किंवा मोठे चट्टे आढळून येतात. पानावर सुरवातीस गोलाकार, तपकिरी रंगाचे लहान ठिपके येतात. पुढे हे एकमेकांत मिसळून ते मोठे होतात. रोगाची लागण रोगग्रस्त झाडांचे अवशेष (पालापाचोळा व बोंडे) यामुळे होतो. रोगाचा प्रसार हवेतून होतो. रोगाच्या नियंत्रणासाठी वेळीच रोगट व गळालेली पाने वेचून जाळून टाकावीत. २० मि.लि. सुडोमोनास फ्लुरोसन्स प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ३०, ६० व ९० दिवसांनी फवारणी करावी. यामुळे जिवाणूजन्य करपा व ठिपके या दोन्ही रोगांचे नियंत्रण होते.

प्रा. डॉ. एम. बी. पाटील
वनस्पतीशास्त्र विभाग, कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ जि. परभणी

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

शंभु टाईम्स
सोमवार दि. ८ ऑगस्ट २०१६

Sonpeth Pin:-431516 Late Ramesh Warpudkar ACS College Tq. Sonpeth Dist. Parbhani

शंभु टाईम्स
सोमवार दि. ५ सप्टेंबर २०१६

## कृषि विषयक सल्ला

जवळपास वीस एक दिवसाच्या उघडिपीनंतर झालेल्या पावसामुळे आता सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळत आहे. पण याच बरोबर थोडेशे कळजीही वाटत आहे. कारण आताचे वातावरण कापसावर पांढरी माशी, थ्रीप्स इ. किडींचा प्रादुर्भाव होण्यास अनुकूल आहे. याच बरोबर बुरशींचा प्रादुर्भाव ही मोठ्या प्रमाणात आढळून येतो. त्यासाठी शेतकर्यांनी ॲसिफेट, या किटकनाशकांचा व कार्बेन्डाझीम ५०%, हेक्झाकोनाझोल, थाईबेन्डाझोल या सारख्या बुरशीनाशकांचा वापर करावा. याच बरोबर आता कापसाला बोंडांची संख्या बऱ्यापैकी असल्यामुळे त्यांना अन्नद्रव्यांची कमतरता पडून लाल्या रोग पडण्याची शक्यता बळावते यामुळेच खताचे व्यवस्थापनही महत्वाचे आहे त्यामुळे अन्नद्रव्यांची कमतरता पडून लाल्या रोग पडण्याची शक्यता बळावते. त्यामुळे पोटॅश, युरीयासोबत झिंक व म्यॅग्निशीअम यांची मात्रा कापसाला दिल्यामुळे लाल्या रोगाचे नियंत्रण करण्यास मदत होते.

प्रा. डॉ. एम. बी. पाटील
वनस्पतीशास्त्र विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी मो. ७५८८०१७७१३

* Farmers are informed about incidence of Diseases and it's preventive measures.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

३ साप्ताहिक कृषकोन्नती
दि.१८ ते २४ डिसेंबर २०१८

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist.Parbhani

# अझोला उत्पादन

अझोला हे पाण्यावर तरंगणारे एक फर्न आहे. बऱ्याचदा आपण पडक्या विहिरीत किंवा साठलेल्या पाण्यामध्ये आझोलाचा हिरवा थर जमा झालेला पाहतो. हवेतील नत्र शोषून ते साठवून ठेवण्याची क्षमता अझोलामध्ये असते म्हणून त्याचा जैविक खत म्हणून भाताच्या शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वापर केला जातो पण ज्या ठिकाणी भाताचे पीक घेतले जात नाही अशा ठिकाणी सुलभतेने व उच्च प्रथिने असणाऱ्या अझोलाचा पाळीव प्राण्यांसाठी खाद्य म्हणून स्वस्त आणि मस्त पर्याय ठरू शकतो फक्त गरज आहे ती याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची.

**अझोला मधील पोषक घटक:** अझोला मधील पोषक घटकांचा विचार करता असे लक्षात येते की यामध्ये प्रथिणे २०-२५ टक्के फायबर १२-१५ टक्के त्याचप्रमाणे कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम, कॉपर, आयरन इत्यादी मिनरल्स मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळेच अझोला हा एक पशुखाद्य म्हणून सध्याच्या काळात समोर येणे खूप गरजेचे आहे.

**अझोला उत्पादनाची कृती :** ज्याठिकाणी अझोलाचे बेड तयार करायचे आहेत ती जमीन समतल व स्वच्छ करून घ्यावी. विटाच्या एकावर एक दोन थरांच्या साह्याने २ मी ३ मी चे चर तयार करून घ्यावेत. विटांनी तयार केलेल्या अशा आयातकार चरावर युवी स्टॅबिलाईझड सीट पसरवून घ्यावी अशा प्रकारे अझोलाचे बेड तयार केले जातात हल्ली बाजारात अझोला उत्पादनासाठी आवश्यक रेडिमेड बेडही मिळतात.

अशाप्रकारे तयार झालेल्या बेडमध्ये बूडाला १० ते १५ किलो बारीक चाळुन माती पसरावी. दोन किलो शेण, तीस ग्रॅम सुपर फॉस्फेट, व थोड्या प्रमाणात मायक्रोन्यूट्रियन्ट दहा लिटर पाण्यात मिसळून त्याची स्लरी तयार करावी. हि स्लरी मातीवरती समप्रमाणात मिसळावी. नंतर बेडमध्ये सात ते आठ सेंटीमीटर एवढे पाणी टाकावे.. या पाण्यावर कचरा असेल तर तो चाळणीच्या सहाय्याने काढून घ्यावा आणि त्यामध्ये अर्धा ते एक किलो अझोलाचे कल्चर पाण्यावर पसरून घ्यावे. त्यावर तात्काळ पाणी शिंपडावे.. आता दहा दिवसांमध्ये या अझोलाचा पूर्ण थर पाण्याच्या पृष्ठभागावर पसरलेला आपल्याला पहायला मिळतो. अझोलाच्या बेडवरती शेडनेट बांधल्यास तीव्र सूर्यप्रकाशापासून त्याचे संरक्षण होईल. अझोलाची लवकर वाढ व्हावी आणि दररोज उत्पन्न मिळावे यासाठी पाच दिवसांच्या अंतराने २० ग्रॅम सुपर फॉस्पेट आणि १ किलो गाईचे शेण अझोलाच्या बेडमधील पाण्यात मिसळावे व दर दहा दिवसांनी बेडमधील पंचवीस ते तीस टक्के पाणी बदलावे बेड स्वच्छ. ठेवावा पाणी व माती वेळेवर बदलावी आणि दर सहा महिन्यांनी नवीन अझोला लावावा.

लागवडीनंतर १० ते १५ दिवसांत अझोलाची भरघोस वाढ झालेली दिसून येईल एखाद्या चाळणी किंवा ट्रेच्या मदतीने आझोलाची काढण केली जाते एका बेड मधून दररोज सुमारे ५००-६०० ग्रा अझोलाची काढणी होऊ शकते काढलेला अझोला ताज्या पाण्याने धुवावा जेणेकरून त्याला येणार शेणाचा वास कम होईल हा ताजा आझोला किंवा सुकलेला अझोला पशुखाद् म्हणून वापरले जाते.

**अझोला चारण्याची पद्धत :** दुभत्या गायीआणि म्हशी यांच्या चाऱ्यामध आणि खुरांकाध्ये एक ते दीड किलो प्रतिदिन मिळून एकास एक प्रमाणात खा घालावा त्यामुळे दुरी पॅनलना त्याचबरोबर दुधातील फॅट मध्ये वृद्धी होते. प जनावरांना अझोला देत असताना एकदम एक ते दीड किलो अशा प्रमाणा न देता सुरुवातीला शंभर ग्रॅमपासून चालू करून त्याचे प्रमाण दिवसेंदिव वाढवत एक ते दीड किलोपर्यंत न्यावे

लहान वासरांना तीनशे ते पाचशे ग्रॅम अझोला दररोज द्यावा.

शेळ्या आणि मेंढया यांच्यासाठी सुद्धा अझोलाचा वापर केला जातो.

पाळीव पक्षी (कोंबडी, बदक, इमू इ.)च्या खाद्यात मिश्रण स्वरूपा अझोलाचा वापर करावा.

**अझोलाचे फायदे :** अझोलाच्या वापरामुळे पशुखाद्यावरील खर्चात १५ २० टक्क्यांची बचत होते

जनावरांत गुणवत्तावृद्धी होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढते, आरोग सुधारते व आयुष्यामन वाढते.

दुभत्या जनावरांना अझोला चारल्यामुळे त्यांच्या दूधात व दुधाच्या फॅट मध वाढ होते. शेळी/मेंढी, डुकरे किवा ससे यांना अझोला चारल्यामुळे त्यांच झपाट्याने वाढ होते तसेच वजनामध्ये वृद्धी होते.

पाळीव पक्षी - कुक्कुट, बदक, इमू, इ. ना अझोला चाराल्यास त्यांचे वज वाढते व अंडी देणाऱ्या पक्षांच्या उत्पादनात वाढ होते, तसेच अंड्यांचा पृष्ठभा चकचकीत होतो अझोलाच्या वाफ्यातून काढण्यात येणारे पाणी नत्रयुक्त खनिजयुक्त असल्याने पिकांसाठी झाडांसाठी वापरता येते.

वाफ्यातून काढण्यात येणाऱ्या एक किलो मातीचे गुणधर्म हे सुमारे ०. किलो रासायनिक खताइतके आहे. अश्याप्रकारे अझोला लागवड हे सोपे अल्पखर्चिक व किफायतशीर तंत्रज्ञान असून, ते शेतकऱ्यापर्यंत पोहचवणे त्याचा जनावरांच्या आहारात वापर करणे ही काळाची गरज आहे

प्रा. डॉ. मुकुंदराज बाबुराव पाटील
वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ, जि. परभणी
मो. ९६५७७००२३

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

Article about - 'Azolla Production'



सोनपेठ : कडुनिंबाच्या झाडाची पाने अळ्यांनी खाऊन टाकल्यावर केवळ काड्याच शिल्लक राहिल्या आहेत.

# कडुनिंबावरच पाने खाणाऱ्या 'अळी'चा प्रादुर्भाव!

**सोनपेठ, ता.१५ (बातमीदार) :** नैसर्गिक कीटकनाशके म्हणून ओळख असणाऱ्या कडुनिंबावरच पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव पाहावयास मिळत असल्यामुळेच आश्चर्य व्यक्त होत आहे. कडुनिंब हे भारतामध्ये जंतुनाशक म्हणून मान्यता प्राप्त आहे. नैसर्गिक कीटकनाशक म्हणून याचा प्रामुख्याने वापर करण्यात येतो.

कडुनिंब हे सर्वच दृष्टीने उपयुक्त असल्यामुळे त्याचा औषधी म्हणून वापर केला जातो. या झाडाची पाने, फुले, फळे, साल, बियांमुळे हे सर्वच अत्यंत कडू असल्याने त्याचा जंतुनाशक म्हणून वापर होतो. मानवी आरोग्यात तसेच पिकांवरील अनेक रोगांवर याचा गुणकारी औषध म्हणून वापर प्रामुख्याने केला जातो. कडुनिंबाचे निंबोळी अर्क कीटकनाशक म्हणून मोठ्या प्रमाणात वापरतात. यात असलेल्या 'अँझाडिरॉक्टिन'मुळे मावा, अमेरिकन बोंडअळी, तुडतुडे, देठ कुरतडणाऱ्या अळ्या, फळमाशा, खोडकिडे व पाने कुरतडणाऱ्या अळ्या यावर प्रभावी औषध म्हणून कडुनिंब समजले जाते. हे अँझाडिरॉक्टिन निंबाच्या पानातही असते. परंतु, गेल्या काही दिवसांपासून कडुनिंबाच्या झाडांवरच पाने कुरतडणाऱ्या हिरव्या अळीचा मोठा प्रादुर्भाव पाहावयास मिळत आहे. या अळ्या निंबाच्या झाडांची पाने पूर्णतः खाऊन टाकत असून, पानांच्या जागी अतिशय खादाड असणाऱ्या या अळ्याच दिसून येताहेत. या अळ्या पाने खाऊन केवळ शिराच शिल्लक ठेवत आहेत. त्यामुळे निंबाच्या झाडावर केवळ काड्याच दिसत आहेत. कुठल्याही निंबाच्या झाडाखाली गेल्यावर या हिरव्या अळ्यांचा सडाच पाहावयास मिळत आहे. जगभरात पाने खाणाऱ्या अळीवर प्रभावी नैसर्गिक कीटकनाशक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या निंबाच्या झाडावरच या घातक अळ्या आढळून येत असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कडुनिंबाच्या झाडावर पडलेल्या या किडीमुळे कडुनिंबाची नैसर्गिक कीटकनाशकाची मूळ ओळखच लोप पावते की काय? असा सवालदेखील उपस्थित होत आहे.

**कीटकनाशकांच्या अतिवापराचा परिणाम**

वनस्पतिशास्त्रज्ञ प्रा. डॉ. मुकुंदराज पाटील यांनी सांगितले, की हरितक्रांतीनंतर सूक्ष्मजीव व कीटकांच्या नियंत्रणासाठी विविध रासायनिक कीटकनाशके किंवा जंतुनाशके यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याच्या अतिवापरामुळे या जंतू व कीटकांमध्ये या रासायनिक घटकांप्रती प्रतिकारक्षमता वाढलेली पाहावयास मिळते. ज्याप्रमाणे रासायनिक औषधांचा वापर वाढलेला आहे, त्याचप्रमाणे निंबोळी अर्क हेसुद्धा खूप मोठ्या प्रमाणात शेतीमध्ये वापरले जात आहे. पर्यायाने त्याचीसुद्धा प्रतिकारक्षमता या कीटकांमध्ये व जंतूमध्ये आलेली पाहावयास मिळते. आजकाल कडुनिंबाच्या झाडांवरसुद्धा कीटकांचा व जंतूंचा प्रादुर्भाव हल्ली होत असलेला पाहावयास मिळत आहे. हे असेच चालू राहिले तर एक दिवस मनुष्याला कीटकांवर नियंत्रण करणे अशक्य होणार आहे. अशा प्रकारे जिवाणूंचे सुपरबग तयार झालेले .उदाहरणही आपणास पाहावयास मिळते.

# DR. S. B. KADAM PUBLISHED HIS ARTICLES REGARDING MA RATHI LITERATURE

Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

गोदातीर समाचार रविवार दि. २६ फेब्रुवारी २०२३ पान २

# बालमनाला वेड लावणाऱ्या कविता : 'हत्तीच्या सोंडेचा जन्म'



पुस्तक परीक्षण

प्रा. ...

(कवितासंग्रहाचे नाव :- हत्तीच्या सोंडेचा जन्म
...
प्रकाशक :- ... प्रकाशन, औरंगाबाद
आवृत्ती :- १ ...
...
किंमत :- ...)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
चतुरंग
शनिवार, ७ नोव्हेंबर २०२०
आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी
chaturang@expressindia.com



## मनस्वी भावलेली कथा

'मनातलं कागदावर' या सदरात उज्वला रानडे यांचा 'बेबी बंप' (१७ ऑक्टोबर) ही कथा वाचली. गर्भवती असणे हा स्त्री जीवनातील सर्वोच्च आनंदाचा क्षण मानला जातो, पण वेगवेगळ्या सामाजिक व आर्थिक स्थितीतल्या दोन स्त्रिया आणि त्या दोघींच्या जगण्यातील महदंतर लक्षणीय पद्धतीने आणि प्रकर्षाने लेखातून आलेले दिसते. एका स्त्रीच्या दुसऱ्या बाळंतपणाची बातमी करण्यासाठी धडपडणार वृत्तवाहिनीचे मालक आणि आपण गरोदर आहोत हे इतरांना कळले तर नोकरी जाईल ही टाळेबंदीच्या काळातील पत्रकारिता क्षेत्रातील विवंचना, नोकरी गेली तर घर कसे चालवावे, हा प्रश्न नजरेसमोर ठेवून गर्भाला सैलसर टॉपमध्ये दडवू पाहणारी नेहा. एका 'बेबी बंप'ला कॅमेऱ्यात कैद करण्याची धडपड, तर दुसरीकडे आपला 'बेबी बंप' किती दिवस आणि कसा लपवता येईल याची काळजी, असे विरोधाभासी वास्तव येथे आढळले. नेहाच्या करिअरमधील चढ-उताराला समर्थ साथ देणारा तिचा नवरा विक्रम हा अतिशय 'मॅच्युअर' वाटला. दुसरीकडे अभिनेत्री उर्वशीच्या चार्टर्ड फ्लाइटला एक तास उशीर झाल्यामुळे नेहाच्या मैत्रिणीबरोबरच्या गप्पांमधून पत्रकारिता क्षेत्रातील नोकरीची अनिश्चितता, वैभवशाचा मोबदला अन् सतत कॅमेऱ्याच्या झगमगाटात राहूनही अंतर्मनात दडलेली दुखरी सल- जी कधीही प्रेक्षक रसिकांना दिसत नाही, ती सहजपणाने उघडी करून दाखवणारी ही कथा मनस्वी भावली.

– प्रा. सखाराम कदम, परभणी

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

# संतपण जेथे वसे

भारतात आध्यात्मिक विचारांच्या दोन परंपरा आहेत. एक आचार्य परंपरा व दुसरी संत परंपरा असे र.आ.मंचरकर म्हणतात. संत म्हणजे साक्षात देवाचे रुप. इहलोकी शवरणारी ईशवराची प्रतिमा म्हणजे संत होय. 'संत' संकल्पनेचा पहिला टसठशीत उच्चार मराठीत संत मुक्ताबाई यांच्या 'ताटीच्या अभंगा'तुन आल्याचे दिसून येते.

*ते संत जेणे व्हावे ।*
*जग बोलणे सोसावे,*
*संतपण जेथे बसे ।*
*तेथे भूतदया असे ।।*
*किंवा*
*विश्व रागे झाले वन्ही ।*
*संत सुखे व्हावे पाणी ।।*

असा हा संतत्वाचा उल्लेख करून लहानग्या मुक्ताईने संत ज्ञानेश्वरांच्या मनातील किल्मीषे दूर सारली व त्यांना जीवनसन्मुख होण्यास प्रवृत्त केले.

संत ज्ञानेश्वर संत नामेदव, संत एकनाथ, संत तुकाराम यांनी मुख्यत्वे पंढरपूरचा विठ्ठल हे उपास्य दैवत मानले व

*वळिया माझा पंढरीरावा।*
*जोया देवांचाही देवा ।।*

म्हणत एकेश्वरवादी शिकवण मराठी जनमानसात रुजविली. यासाठी 'पापे जन्मांतरींची!' म्हणत सहजसुलभ भक्तिमार्ग सर्वासाठी खुला केला. या संताच्या अंगी व्यक्तीमत्वाची शुध्दता व गुणसंपन्नता, आत्मोध्दारा बरोबरच लोकोध्दाराची आस ही लक्षणे असतात, असे प्रतिपादन केले.

'संत' म्हणजे अस्तित्वात असणारा. अखंडपणे अविकृत रुपात आढळतो, तो संत. मराठी सोबतच हिंदी व गुजराती या भारतीय भाषेतही हा शब्द वापरला जातो. उदा.कबीर, मीरा, नरसीमहेता, सूरदास, तुलसीदार हे ही संत म्हणुन ओळखले जातात. संत ही



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

आध्यात्मक्षेत्रातील अत्यंत उच्चकोटीची अवस्था आहे. हे सर्व संत युगंधर लोकनायक होते. ते इहलोक तसेच परलोकीचे मार्गदर्शक होते.संत या शब्दाचा उपयोग बहुधा बुध्दिमान, परोपकारी, सदाचारी व भक्त या अर्थांनी केला जातो. या सामान्य अर्थानें वारकऱ्यांबरोबरच इतर संप्रदायातील सत्पुरुषांचाही

## प्रा. सखाराम कदम, परभणी

'संत' या संज्ञेने निर्देश करता येईल.

*जगाच्या कल्याणा।*
*संताच्या विभुती।*
*देहकष्टविती । परोपकारो ।।*

म्हणजे संताच्या विभूती जगाच्या कल्याणासाठीचं असतात. वारकरी संप्रदायात संतांच्या आशीर्वादामुळे संकटावर मात करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते, पारमार्थिक आनंदाची प्राप्ती होते असे मानले जाते. म्हणूनच

*संतरंग संगती ।*
*मनोमार्ग गती (ज्ञानेश्वर)*
किंवा
*न लगे मुक्ती धन संपदा।।*
*संतसंग देई ।। (संत तुकाराम)*
म्हणतात,

प्रेम, करुणा, माणूसकी, नैतिकता यांच्या पायावर समाजाची उभारणी व्हावी ही संतांची तळमळ प्रत्येक काळात आवश्यकच आहे. संतांनी आध्यात्मिक क्षेत्रापुरती का होईना समतेची व मानवतावादाची गुढी उभारली. आपल्या आचरणातून मानवी मूल्यांचा आंगीकार करत मराठी लोकजीवनावर उत्तम संस्कार केले. माणसाच्या माणूसकीला प्रतिष्ठा मिळवून दिली. आपल्या सहवासात आलेल्यांचे दुःख समजून घेऊन ते दूर करणे हा संतांची सहजधर्म मानला म्हणूनच

*जेका रंजले गांजले ।*
*त्यासी म्हणे जो अपुले*
*तोचि साधू ओळखावा ।*
*देव तेथेची जाणाया किंवा*
*बुडती हे जन ।*
*न देखवे डोळा ।*
*येतो फळवळा ।*
*म्हणोनिया ।।*

ही खरी संतवृत्ती होय. संताचे वास्तव एकाच जागी नसते तर 'हे विश्वाची माझे घर' ही त्यांची व्यापकवृत्ती असते. संतपण केवळ वाणीत नसते तर ते कृत्तीतुन साकारते

*लेकुराचे हीत ।*
*वाहे माऊली चित्त ।*
*ऐसी कळवण्याची जाती ।*
*करी लाभायिणा प्रिति ।।*

अशी संतांची निःस्वार्थ वृत्ती असते. 'जनी जनार्दन' हा त्यांच्या वृत्तीचा सहजभाव असतो. सर्वजन माझे आहेत आणि मी सगळ्यांना आहे ही अनुभूती येणे म्हणजे संतत्त्व. गंगेच्या पाण्यासारखे निर्मळ व पवित्र असं मन या संतांजवळ त्यांच्या आचारणातून मिळते. संत हे निःस्पृह, दयाळू दृढ मनोनिग्रह असणारे सर्व प्राणिमात्राचे कल्याण चिंतीनारे, स्थीर स्वरुपी व अलौकीक शांती असणारे सदैव प्रसन्नचित तरीही उपाधीमुक्त असतात. म्हणूनच ज्ञानेश्वरीत माऊलीने म्हणटलंय

*ते ज्ञान पैगा बरवे ।*
*जरी मनी आथि आणावे ।*
*तरी संता या भजावे*
*सर्व स्वेसी ।। ४ –१६३*

संदर्भसूची:

१. पांगारकर, ल. रा. : मराठी वाड्मयाचा इतिहास,खंड पहिला विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,पुणे दु.आ.१९८२, २. नसिराबादकर, ल.रा. प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, ३. श्री सकल संतगाथा

[redacted]
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin:-431516
★ Tq.Sonpeth Dist.Parbhani ★



# गातो आजकाल मी 'गझल माणसांची'

गझल हा मूळ अरबी शब्द ; पण काव्यप्रकार फारसी घासेतून ऊर्दूत शिरून मराठी, हिंदी, गुजराती भारतीय भाषात रूढ झाला. त्याची मूळ प्रवृत्ती शृंगारकाव्याची. स्त्री बरोबर केलेल्या गुजगोष्टी' हा शब्दाचा कोशातील अर्थ. पुढील काळात मात्र भक्ती, अध्यात्मापासून सामाजिक, राजकीय व राष्ट्रीय स्वरूपाचे विषयही गझलेतून येऊ लागले.

गझलेच्या बांधणीत शेर व मतला या गोष्टी हमखास असतात. शेर म्हणजे दोनदोन ओळींची स्वतंत्र कविता. अशा पाच ते सात कडव्यांची मिळून गझल लिहिली जाते. गझलेतील प्रत्येक शेर स्वयंपूर्ण असतो, त्यामुळे तो वेगळा काढून स्वतंत्रपणे सुभाषितासारखा वापरता येतो. वृत्तांची विशिष्ट मांडणी, काफिया व रदीफ अशी यमकयोजना ही गझलेची दर्शनी वैशिष्ट्ये आहेत.

मराठीतील पहिली गझल म्हणून माधवराव पटवर्धन यांच्या 'जगण्यावरचा ... नाही कसे म्हणावे' या रचनेला मानले जाते. त्यानंतर मोरोपंतांनीही गझलरचना केल्याचे दिसते. ... साली स्थापन झालेल्या रविकिरण मंडळातील कवी माधव ज्युलियन यांनी साक्षेपीवृत्तीने गझल काव्य प्रकाराचे लेखन केले. त्यांचा 'गझलांजली' (१९३३) हा संग्रह मराठीत दाखल झाला व मराठी कवितेला गझलेची गोडी लागली. माधवरावांनी गझलचा व्याकरणाचा विचार न करता विविध प्रकारचा उपयोग भाववृत्तींच्या सहज ... केला. गझलेची ... मांडणी, नाट्य, चटका, शब्दांचा मुक्तपणा, शब्दांची ... फेक, उत्कटता, शब्दांच्या ... विविध वैशिष्ट्यांमुळे ... कवितेच्या अभिव्यक्तीला ... झळाळी प्राप्त झाली. माधव ज्युलियनांच्या पाठोपाठ ... कवी गिरीश, भा.रा. ... यांनीही मराठीत गझलरचनेचे ... केल्याचे दिसते. अलिकडे ... सुरेश भट यांनी केलेली गझलरचना ही सर्वांत लोकप्रिय ... जाते. भटांनी गझलेला ... माणसांच्या मनामनात कवी ... सजवले, सुरेश भट यांच्या ... गझलेने पुन्हा एकदा गझल ... लेखनाकडे कवींना आकृष्ट केले व गझलेची चळवळ उभी राहिली. ... भिडे, ... पाठकावकर, ... भावे आशा प्रभू यांनी ... गझलरचना ही मराठी मनावर ... हेतो घालते. ... 'माटीचा ... असा या ... पाहगावकरांची ... या जगण्यावर शब्दांचं

प्रेम करावे' या गझलांनी मराठी मने समृद्ध बनवली. यातूनच या गझलेच्या प्रांतात मुशाफिरी करू बघणाऱ्यांची संख्या वाढू लागली. इलाही जमादार, भाऊसाहेब पाटणकर, वजन सराहकर, राजेसाहेब कदम, मुकुंद राजपंके, संदीप खरे, वैभव जोशी, सुरेशचंद्र नाडकर्णी, आदी अलिकडे गझल लेखनात नितीन देशमुख, शरद धनगर (बुलढाणा), सतिश दराडे (बीड), भरतकुमार वाघमारे (लातूर), अमीत वाघ (अकोला), इंद्रजित उगले (बीड), सुधीर मुळीक (मुंबई), गोपाल मापारी (अकोला) ही नावे गझलेच्या प्रांतात आज लिहित असताना पहायला मिळतात. प्रत्येकाच्या गझलेला रंग व ढंग वेगळा असून प्रत्येक शेराची जुगलबंदी संस्मरणीय ठरावी अशी आहे. याच प्रांतात परभणी येथील गांधी विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरी करणारे कवी अरविंद सगर हे नव्यानेच दाखल होत आहेत. त्यांचा 'गझल माणसांची' हा गझलसंग्रह नुकताच जनशक्ती वाचक चळवळीने काढला. त्यानिमित्ताने 'गझल माणसांची' संग्रहाविषयी थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

*'लेखणी माझी सदा बेचैन राहो*
*मन ज़िजाला कोणताही पेन राहो'*

ही भूमिका घेऊन नव्यानेच कवितेच्या प्रांतात प्रवेश करू बघणाऱ्या अरविंद सगर यांच्या 'गझल माणसांची' या पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहातून माणसाच्या जगण्याची मनाची दुःखरी बाजू प्रकाशत येते. जनशक्ति वाचक चळवळ औरंगाबाद ने प्रकाशित केलेल्या या गझल संग्रहाची अर्पणपत्रिकाच मुळात 'माणुसकीसाठी झटणाऱ्या आणि 'माणूसपण' जगणाऱ्या सर्वांना..' अर्पण केली आहे. या गझलेच्या संग्रहातून दुःखी, शोषित, कष्टकरी, कामगार इ. सर्वहारा समाजातील माणसांच्या जखमांना व व्यथा वेदनांना आलेले हे शब्दरूप आहे. कवी म्हणतो, ज़िजाला पेन कुठलाही असला तरी मला ही समाजातील अस्वस्थ जाणीव पिळवटून टाकते व मी जे लिहितो ते वाचण्यासाठी जगावं आणि विरघळून घ्यावं कारण ठरतं. प्रस्तुत काव्यसंग्रह वाचून झाल्यावर मला खालील सूत्ररूप मुद्दे सांगावेसे वाटतात. शेतकरी, कष्टकरी वर्गाचे अभावग्रस्त जगणे मांडणाऱ्या गझल, प्रेमभावनेच्या गझल, समकालीन वर्तमान व कायदेमंडळातील निष्क्रियता दर्शविणाऱ्या गझल, धोरणांची अंमलबजावणी व विसंगती दर्शविणाऱ्या गझल तसेच स्वतः च्या अभावग्रस्त जगण्याचे गाणे गाणे मांडणाऱ्या गझल हे ते मुद्दे होत. पेन

बदलला तरी या सगळ्या गझलेतून येणारी दुःख ही 'दुरितांचे तिमिर जावो' याच एका भावनेतून ओतप्रोत होतात.

*शब्द हे नाहीत नुसते कागदावर*
*ठेवले काळिज कोऱ्या कागदावर*

अशी ही मनाच्या अगदी तळाच्या कोपऱ्यातून आलेली अलवार भावना आहे. येथला कष्टकरी शेतकरी कसदार धान्याच्या पिकांचे अपूर्ण सिंचन करतो. तरीही नियतीसमोर हतबल ठरतो. तो कविच्या संवेदनशील मनाला काही केल्या स्वस्थ बसू देत नाही.

*'भिजविले शेतास मी घामात माझ्या*
*वेच तू दाणे आता रक्तात माझ्या'*

रानामनात अहोरात्र राबणारा शेतकरी. त्याच्या घामातून फुललेला मळा, हा कवीला वैकुंठ या कैलासापेक्षा पवित्र भासतो. या काळ्या आईच्या ऋणातून उतराई व्हायचं असेल तर त्याचं एकच मागणं आहे ते म्हणजे मेल्यानंतरही आपलं शरीर आपल्या मातीतच पुरलं जावं, एवढी समर्पणाची ओढ त्याला व्यापून उरते.

'दिवसाढवळ्या' या संग्रहातील पहिल्याच गझलेत कवी अरविंद सगर यांनी लोकशाही व धर्मनिरपेक्ष भारत देशातील कायदेमंडळ व कार्यकारी मंडळातील बेपर्वाई, विवेकी माणसांच्या होणाऱ्या राजरोस कत्तली, गांधीजींच्या देशातील ही हिंसा तरीही चांदण्या कमळ्यातील नेतेमंडळीचे शुभ्र सफाईदार खोटे बोलणे यामुळे कवीमनाला पडणारे प्रश्न दिसून येतात. या गझलेच्या शेवटी कवी सर्वसामान्यांच्या जगण्याबद्दल फक्त म्हणतो –

*'जमेल तितके यावे*
*अन् त्याने जगावे*
*अनुभवावा खेळ नि मागा*
*दिवसाढवळ्या'*

कारण या सर्वहारा समाजाची चिंता वाहण्यात कुणीही या व्यवस्थेत शिल्लक नाही ही खंत कविमनाला बोचते. पण ही सगळी कृतिशून्य असलेली भावजागृती ठरते. 'पिढ्यांपिढ्या ची पडझड होते, तरी गप्प मी' या ओळीतून सार्वभौम लोकशाही राष्ट्रातील सर्वसामान्य माणसांचे दुबळेपण, त्यांनी मौन पाळण्यामुळे होणारी नीतीमूल्यांची पडझड कवी रोखू शकत नाही. येथल्या मतपेट्यांची धडधड, संसदेतील बडबड, यामुळे लोकशाही बावळट होते. येथल्या सगळ्या माणसांनी आपल्या छातीत अनेक कढ उतू जाणारे हुंदके दाबून ठेवलेत, तरीही ते जीवंत राहून श्वास कसे घेऊ शकतात? हा प्रश्न कवीमनाला पडतो. ही अगतिकता:

*'घोट बदलले तरी 'प्रगती'*
*जात मतिमंद गर्भाशयांच*
*मारक होते तरी गप्प मी*
*मी अनाथांच्या शेजारी बसलेला,*
*जेथे हा एक टांग वरचढ होते*
*तरी गप्प मी'*

या ओळीतून अधीक गहिरी होतांना दिसून येते. या संग्रहातील 'मखमली गावांच्या गोधड्या', 'दिल्ली कोटीचा ठिपका', 'कापूस न लागणाऱ्या 'जो'बाज कुंड्या', 'हृदयाच्या भात्यातून वाजणाऱ्या नुसत्या पुंग्या', 'एका एका माणसाने अख्ख्या मातीला खाऊन टाकणे' या हायटेकपणामुळे कवी म्हणतो

*'देश जर डिजीटल महासत्ता,*
*तर मग*
*का भुकेच्या चाकाच्या*
*झुंडीच चुलाच्या ?*

दररोजच्या माणसांचे हे संवेदनाहीन जगणे, नितीमूल्यांची होणारी रोजची पडझड, सार्वत्रिक बाजारीकरणाच्या प्रक्रियेमुळे बथ्थड झालेली मने यामुळे कवीला जीवंत माणसाचा शोध घेण्याची गरज जास्त तिव्रतेने वाटते. इथे कवीला रामाच्या अयोध्येत रावणांचा भरलेला दरबार दिसतो. राज्य झालेल्या झोपड्यांतूनही हिंस्र श्वापदांचा वावर दिसतो. येथल्या 'मुडदा समजतीतूनही त्याला उत्तर मिळणार नसते' तेव्हा लोकशाही देशात राहणाऱ्या माणसांना याच संतांच्या महाप्यांने कल्याण प्रश्नांची उकल होईल असे वाटते कारण

*'जिल्हीत पाय पडली जेव्हा*
*बंगल्यात सजोरती*
*आज म्हणे त्यांच्या नेत्याला*
*थामले करमत होते.'*

असे कुटील कारस्थानी नेते व त्यांचे अनुयायी, कार्यकर्ते यांच्याशी सल्लामसलत करणे म्हणजे नव्या षडयंत्राला जन्म देणारी ती बाब ठरते, असे कवीला वाटत असावे.

या संग्रहातून मोठ्या घरातल्या मुलाचा उघडा बाप कवी न्याहाळतो, त्याचा संस्कृतीशी झालेला करार मान्य करतो. 'जगण्यालाच लागलेला कर्ज', 'आसवांचे टोळके', 'नजरानजरे युद्ध लढणे', 'बेगडी अत्तराशी नाते जपणे', 'पावसाने बापराची वाफडी सोलणे', 'पावसांनी लाख पूल धरायणे करणे', 'सांबीरांनी गल्ली धर्म होणे', 'भूकेचे नागवे फिरणे', 'बंगल्याचे मोठे पोट असूनही भूकेने नगारा वाजवणे', 'भाकरीच्या शिळ्या घोषणा...' आदी प्रतिमांमधून कविच्या मनातील खूप काही हरवत जाण्याची अस्वस्थता दिसून येते. निसटून गेल्याच्या भावनेमुळे गावाच्या बदललेल्या अवकळेने, माणसातील पशुत्वापुढे कविमनाला घोर पडल्याचे संदर्भ अधीक गडद होतात. ही सल, ही भळभळती जखम घेऊनच कवी मन येथल्या भ्रष्ट राजकारणाचे, नातेसंबंधाचे परखड निरीक्षण करतो. माणसातील माणूसपण जपत हसत जातांना पाहून संचित मुद्रेने

*किती जमाना प्रौढ जाहला*
*बालपणी हा कुणीच नाही*
*बालपणाचे वागत आता पाय*
*पडावे असे कुणी ना उरले येथे*
*नाही कोणी छातीलाही लागत आता*

अशा ओळीतून मनातील घुसमटीला वाट मोकळी करून देतो. येथल्या विठ्ठलाला तलवारीनेही जाग येत नाही, म्हणून माणसांना सावलीचीही सोबत मिळत नाही.

प्रस्तुत संग्रहातील अनेक गझलांमधून भ्रष्ट राजकीय व्यवस्थेचे चित्रण होतांना दिसून आले आहे. उदा.

'संसद म्हणजे खुला तमाशा दिवसाढवळ्या' (पृ.१३)

'दिल्ली श्वास मला मराठी दिपाला' (पृ.२६)

याशिवाय 'उपाशी' (पृ.२९), 'पर म्हणावे' (पृ.३८) या कवितांमधूनही हे संदर्भ अधिक गडदपणे व्यक्त होतात. कवी या लोकशाही राष्ट्रातील कायदेमंडळातील चांदण्या पोशाखातील खादीधारी हस्तकांना काही प्रश्न विचारतो, तक्रार करतो. राजकारणातील निर्ढावलेल्या माणसाच्या सगळ्या जगण्याला प्रश्नांकित करतांना दिसते ती येथेच. याशिवाय 'सांग ना...?' (पृ.५५) गझलेतील तक्रार लक्षणीय आहे.

*'तू अशी कर ना*
*असे फितवा करे कर*
*कर मला वजाय तू*
*माझे हुरे कर'*

याच्याकडे गझलेतून कवीने आपल्या प्रेयसीसोबत केलेल्या गुजगोष्टी, प्रेमाच्या आणाभाका आदी भावनांना व्यक्त केलेले आहे. प्रेमाची ही हळुवार भावना 'ओठांचे ठसे कर', 'डोळ्यात आसवे कर' एवढे बोलूनही कवी थांबत नाही तर आयुष्यातील पशुत्वाला संपवून तिने आपणास माणूस बनवावे ही आशावादी जाणिवही येथेच मांडतो.

येथली नायिका सोडून गेल्यावर कविमनाला स्वतः आभाळाएवढे दुःख झेलावे लागते, ही जाणीव 'आज मी आभाळ होतो' (पृ. ४४) या गझलेतून व्यक्त होतांना दिसते. येथल्या 'पावसाचा जाळ', 'अंतराचा गाळ', चेहरा उन्हाळ', 'कोरडासा माळ', भावना बंबाळ', 'का मला सांभाळ' व शेवटी

*'तू विचारही नको*
*अन् मागेही बघू*
*मी पुन्हा रक्ताळ होतो*
*तू जातांना'*

ही सलगपणे 'ळ' कारी जाणीव एक नाट्यमय चलचित्राप्रमाणे सगळ्या गोष्टींना आपल्यापुढे साकार करते. तर दुसऱ्या एका गझलेत

*'मांगल्या गुज्या वरील*
*वाट आहे*
*अंगावर पुन्हा*
*वळणदार वाट आहे*
*सांभाळून घे सखे*
*तोल एक माझा*
*आज या मनाचा वाट*
*सुसाट आहे.'*

असे आपल्यास सावरून घेण्याची विनंती करणारा प्रियकर येथे दिसून येतो. कारण तिच्याजवळ असल्याने थंडीतही उष्णतेची लाट घेतांना तो अनुभवतो. या गझलेच्या शेवटी येणाऱ्या

*'टेकलेस तू ओठ नि*
*भाग्य उजळ झाले*
*कोणत्या विधीचे माझे*
*ललाट आहे.'*

या नितांतसुंदर शेरातून या कविमनाची प्रतीक उंची गाठता जाते. या संग्रहातील प्रियकराला आपल्या प्रिय व्यक्तीशी बोलता अमणसाठी आपल्या वागण्याचा विसर पडत नाही ही वास्तव जाणीव बाजू ठरते. 'आयुष्यात 'ती' गुलाबी जगता होता' (पृ.९०) या गझलेतून किराणा दुकान हेच त्यांच्या भेटीचे ठरलेले ठिकाण आहे. येथे सामान्यास बघून फक्त आपल्या आवडत्या व्यक्तीला निरखून पाहणे हाच एक छंद जडलेला नायक

*'बाग पडकी, बाग गळक्या*
*पुस्तका शेती घर हरिती*
*हाच माझा 'प्रणय' होता'*


हे वास्तव कधीही नजरेआड होऊ देत नाही. तीच या प्रेमातील जमेची बाजू ठरते. आज आयुष्यातील व्यक्ती आपल्या सोबत नाही तरी तिच्यासोबत जगलेल्या क्षणांच्या आठवणींनी त्याचे जगणे सुगंधी बनले आहे. ही अस्वस्थ जाण

*'गझल पोरकी सांगते मज मर्लीन*
*निवडणाऱ्या येतो विचार कारण आता'*

अशाप्रकारे गझलेला तिच्या एकत्वाचे परिणाम लाभल्याची कबुली कवी देतो. इतकं एकटीकरणाचा दाखला 'पारख्याला आग' (पृ. ५१), 'गालावरी' (पृ. ५८), 'भेट का घेतली तू' (पृ.६१), 'मजे पाहून गेल्यावर' (पृ.५७) आदी गझलांमधूनही ही प्रेमभावना व्यक्त होते. जनशक्ती वाचक चळवळ या दर्जेदार प्रकाशनाने हा संग्रह तयार करतांना खूप कष्ट घेतल्याची जाणीव आहे. पुस्तकाची बांधणी मजबूत असून मजकूर अत्यंत सुस्पष्ट आहे. मुखपृष्ठही विविध रंगांच्या मिश्रणातून उत्तमपणे साकारले आहे. आतील मांडणी सुबक एवं उठावदार झाली असून पुस्तक हाताळणीस सुलभ ठरते.

मराठी साहित्याच्या प्रांतात अरविंद सगर या नव्या दमाच्या एका कवीची ही नितांतसुंदर कविता 'गझल माणसांची' नावाने प्रवेश करते आहे. साहित्याचे मर्मज्ञ जाणकार, रसिक वाचक हा पहिल्याच सगर कविचे लाडकोड पुरवतील अशी आशा बाळगुया शेवटी कवीच्या शब्दातच इतके म्हणेन

*'सोबत्यांनी पान व्हावे,*
*हृदय का पाषाण व्हावे*
*तू असे सोडून जा की,*
*सोडणे आव्हान व्हावे'*



## पुस्तक परिक्षण

प्रा.सखाराम बाबाराव कदम,
मराठी विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
मो.नं. ७३७८९३३१४१


पुस्तकाचे नाव : गझल माणसांची
कवी – अरविंद सगर प्रकाशन : जनशक्ति वाचक चळवळ, फ्लॅट २४४, समर्थ नगर, औरंगाबाद.
एकूण पृष्ठ : १०४ मूल्य : १५० रु.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

दै. गोदातीर समाचार दि. ०४ जुलै २०२१

# शेतकऱ्याच्या व्यथेचा 'कैवार' घेणारी कविता

पुस्तक परीक्षण




[illegible]

-प्रा. सखाराम बाबाराव कदम

मराठी विभाग,

कै. रमेश वरपुडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनपेठ

जि. परभणी, मो.९९७५३८००१४

पुस्तकाचे नाव: कैवार (कवितासंग्रह)

प्रकाशक: गंधर्वाचार प्रकाशन, मंगळवेढा,

जि. सोलापूर प्रथम आवृत्ती ऑगस्ट २०२०

एकूण पृष्ठ : ७२

Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin:431516 Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)